७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २२ मार्च २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## भारताने होर्मुजच्या सामुद्रधुनीला शोधला सुरक्षित पर्याय

नवी दिल्ली (दै. संध्या) : पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर फास आवळला आहे. कोणत्या देशाचे जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जावे यावर इराणचे कठोर नियंत्रण आहे. इराणचे हे नियंत्रण अद्याप तसूभरही कमी झालेले नाही. इराणच्या या सामर्थ्यावर हल्ला करण्याचे अमेरिका आणि इस्रायलचे प्रयत्न अद्याप अपेक्षित यश मिळवू शकलेले नाही. युद्धामुळे भारताला होर्मुझमार्गे होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्याला धोका निर्माण झाला होता. पण भारत आणि इराण यांच्यात फोनवरून चर्चा झाली. यानंतर इराणने भारताला तेल आणि गॅसचा पुरवठा करणाऱ्या जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी दिली. सध्या या परवानगीमुळे होर्मुझमधून भारताला होणाऱ्या तेल आणि गॅसच्या पुरवठ्याला कोणतीही अडचण नाही. पण भविष्यात युद्धामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे होर्मुझमधील परिस्थिती बिघडली तर भारताचे ऊर्जोस्रोत संकटात सापडू नये यासाठी भारताने होर्मुजच्या सामुद्रधुनीला पर्यायी असा सुरक्षित सागरी मार्ग शोधला असल्याचे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिले आहे.

### ढिंग-टांग




# चाकणकरांचा प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा घेणार का?



**नाशिक (दै. संध्या)**

राज्यात गेल्या 4 दिवसांपासून सुरू असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातच्या व्हिडिओवरुन सर्वत्र खळबळ उडाली असून आरोपीचे अनेक दिग्गजांसह फोटो व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर ह्या अशोक खरातच्या संस्थेवर सदस्य असून त्यांचे कौटुंबीक संबंध असल्याचंही त्यांनी सांगितलं. या घटनेनंतर विरोधकांच्या मागणीमुळे तसेच नि:पक्ष चौकशीसाठी रुपाली चाकणकरांचा राजीनामा घेण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनीही याबाबत माहिती दिली असून आता रुपाली चाकणकर यांचे प्रदेशाध्यपदही जाणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर आता त्यांचा पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा घेणार का? असा प्रश्न राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना विचारण्यात आला होता. त्यावर, भुजबळ यांनी स्पष्टपणे उत्तर दिले.

संवैधानिक पदाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रुपाली चाकणकरांच्या राजीनाम्याचा निर्णय घेतला. मात्र, पक्षाच्या अध्यक्ष पदाबाबत पक्षाचे वरिष्ठ नेते आणि राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार निर्णय घेतील.

संपूर्ण चौकशी करून त्यावर निर्णय होतो, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले. तर, ज्या महिलांवर अन्याय झाला असेल त्यांनी पुढे येऊन आपली तक्रार दिली पाहिजे, जे अधिकारी नेमले आहेत ते चौकशी करून कारवाई करतील, असे देखील छगन भुजबळ म्हणाले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा राजीनामा मला प्राप्त झाला आहे. सद्य परिस्थिती आणि सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पदाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला आहे. ही चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक होण्याच्या दृष्टीकोनातून मी त्यांचा राजीनामा पुढील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री यांच्याकडे पाठवत आहे, असे सुनेत्रा पवार यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन सांगितले.

### राजीनामा देतानाही मॉडेलिंगसारखं उभ्या - दमानिया

राजीनामा स्वीकारतानासुद्धा जे दिसलं ते म्हणजे सुनेत्रा पवारांचा चेहरा गंभीर होता, पण रुपाली चाकणकर या तर जसं मॉडेलिंगसाठी उभं राहतात, तशी पोझ देतानाचा फोटो होता. आणि त्यानंतरचं त्यांचं बोलणं ऐकलं तर त्यात कुठेही खेद, विनम्रता नव्हती , एक अहंकार होता. हे सगळं पाहून वाटतं की चाकणकरांना खरंच इंट्रोस्पेक्शन करण्याची गरज आहे. दरम्यान, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे यांनीही चाकणकरांना सहआरोपी करा, अशी मागणी केली आहे.

### अशोक खरात माझ्या ऑफिसमध्ये कधीच आले नाहीत

माझ्या ऑफिसमध्ये ते कधीच आले नाही, त्यामुळे ते माझे खातं चालवत होते असे म्हणणे चुकीचे आहे. ते माझं डिपार्टमेंट कसं चालूव शकतील, कारण ते कधीच माझ्या खात्यात आले नाहीत. माझ्या कार्यकाळात शिक्षण खात्यात अनेक चांगले निर्णय मी घेतले आहेत. माझ्याच कार्यकाळात शिक्षण विभागासाठी अधिक चांगले निर्णय झाले आहेत, असे मी मानतो, असेही केसरकर यांनी म्हटले. केसरकर यांनी संजय राऊत यांनी कलेल्या टीकेसंदर्भात प्रत्युत्तर दिले.

## भोंदू खरात भक्तांवर कारवाई व्हायलाच हवी : उद्धव ठाकरे

**मुंबई (दै. संध्या)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याला मानणाऱ्या सर्वांवरच कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आपण महाराष्ट्र आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहोत. राज्यात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण कायद्याचे पालन करणारेच भोंदूंच्या नादी लागणार असतील, तर भोंदू भक्तांवर कारवाई झालीच पाहिजे, असे ते म्हणालेत. आम्ही लॉजिस्टिकच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे नेत आहोत. याऊलट तुम्ही लिंबाच्या लागवडीवर आलात. पण लिंबाला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही, असेही ते यावेळी म्हणालेत. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेट फॉरवर्डर्स (FFFAI शिक्षण शाखा) ह्यांच्या संयुक्त सहकार्याने शिवसेना भवन येथे आजपासून सुरु करण्यात आलेल्या एक्स्पोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टीक्स कोर्सचे उद्घाटन उद्धव ठाकरे ह्यांच्या हस्ते करण्यात आले.



## रुपाली चाकणकर दर १५ दिवसांनी नाशिकला जायच्या

**मुंबई (दै. संध्या)**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात प्रकरणाने आता गंभीर आणि व्यापक स्वरूप धारण केले असून, त्याचे पडसाद थेट राज्याच्या राजकारणात उमटताना दिसत आहेत. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपांमुळे अटकेत असलेल्या खरातला न्यायालयाने 24 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, तपास यंत्रणांनी चौकशीची व्याप्ती वाढवत प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे. या प्रकरणात नाशिकमधील या भोंदूबाबाशी संबंध असल्याच्या आरोपांमुळे रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. विरोधकांच्या तीव्र दबावानंतर त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा पवार यांची भेट घेत अखेर पदाचा राजीनामा दिला. आता या प्रकरणावरून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. रूपाली पाटील ठोंबरे यांनी मुलाखतीत म्हटले आहे की, विकृत कृत्य करणाऱ्या बाईचा गुरु हा भोंदू बाबा आहे आणि दर पंधरा दिवसांनी त्या नाशिकला जात होत्या. दर पंधरा दिवसांनी त्यांना पप्पा म्हणत होत्या, डॅडी म्हणत होत्या, शुगर डॅडी म्हणत होत्या, याबाबत मला माहिती नाही. कुठल्या बाईने कुठे फिरावे? कोणाशी बोलावे? याचे वैयक्तिक स्वातंत्र्य असले तरी देखील संविधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने अत्यंत जबाबदारीने वागणे गरजेचे असते, अशी टीका त्यांनी केली.



रुपाली पाटील ठोंबरे पुढे म्हणाल्या की, त्यांना जनाची नाही तर बाई म्हणून मनाची देखील लाज नाही, हे कालच्या राजीनामा देतानाच्या फोटोवरून दिसून आले. हसत आहेत, कुठलं वैयक्तिक कारण होतं? अगं वेडी आहेस का बाई तू? मनोरुग्ण आहेस का? कुठला नरेटीव्ह सेट करत आहेस? कुठले वैयक्तिक कारण? त्या भोंदूबाबाचे पाय तुझ्या नवऱ्याला लाव. आम्हाला काही देणंघेणं नाही. परंतु, महत्त्वाच्या पदावर बसून जो बालिशपणा चाललेला आहे तो हा महाराष्ट्र सहन करणार नाही, असे देखील त्यांनी म्हटले.

## कोरेगावात भाजपसोबत निवडणूकपूर्व युती, कामेश कांबळे फडणवीसांना भेटले

**सातारा (दै. संध्या)**

कोरेगावचे शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेत त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. महेश शिंदे म्हणाले की जिल्हा परिषद निवडणुकीच्या आधी महायुतीच्या झालेल्या बैठकीमध्ये युतीच्या बाबत ज्या त्या आमदाराने त्याला योग्य वाटेल त्या पद्धतीने त्यांच्या मतदारसंघात निर्णय घ्यावा असा निर्णय झाला होता. मी माझ्या मतदारसंघांमध्ये युतीमधील दोन्ही पक्षांशी चर्चा केली परंतु एका पक्षाने (राष्ट्रवादीने) स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या बैठकीत माझ्या मतदारसंघातील एकूण सात पैकी 4 जागा शिवसेना आणि 3 जागा भाजप लढवणार असं ठरलं होतं. प्रीपोल अलायन्स भाजपसोबत असल्यानं त्यांच्याबरोबर राहणं हे आमचं कर्तव्यच होतं, असं महेश शिंदे म्हणाले. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे हे साताऱ्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या युतीत असल्याचे कळल्यावर आम्हाला त्यांच्यासोबत जाने उचित वाटलं नाही. केंद्रात जे लोक आपल्या विरोधात आहेत त्यांच्यासोबत काम करणं योग्य वाटलं नाही. माझ्या मतदारसंघातील शिवसेनेचे दोन्ही सदस्य राष्ट्रवादीच्या विरोधात लढून जिंकून आले आहेत. त्यामुळे त्यांनी प्रीपोल अलायन्स यांच्याबरोबर होते, त्या भाजप बरोबर राहण्याचा निर्णय घेतला.तो निर्णय अगदी योग्य होता. पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासोबत प्रीपोल अलायन्सबाबत चर्चा झालेली होती. राज्याची एकनाथ शिंदे गटाने वेगळं व्हायची भूमिका घेतली होती त्यावेळी जी परिस्थिती होती तीच परिस्थिती साताऱ्यात आज झाली. प्रीपोल अलायन्स बरोबर राहण्याचा आम्ही निर्णय घेतला कारण भाजप बरोबरच प्री पोल अलायन्स करून राहण्याचा निर्णय घेतला. शशिकांत शिंदे हे माझे बांधावरचे दुश्मन नाहीत.पण ते आमचे राजकीय विरोधक आहेत त्यामुळे आम्ही त्यांच्या सोबत कोणत्या तोंडाने जाऊ शकतो, असं महेश शिंदे म्हणाले. शशिकांत शिंदे हे त्यांची तुतारी विसरून घड्याळाकडे गेले आहेत याबाबत आम्हाला आश्चर्य वाटत आहे. त्यांनी एकदा भूमिका जाहीर केली पाहिजे. नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे आमचे राष्ट्रीय नेते आहेत ही भूमिका त्यांनी आता जाहीर केली पाहिजे. साताऱ्यात येऊन आमच्या नेत्यांची, केंद्रातल्या नेत्यांची मापं काढली जातात त्या नेत्यांबरोबर अलायन्स करणं योग्य की अयोग्य हा विचार सर्वांनी केला पाहिजे. जिल्ह्यात पोलीस प्रशासन हे पालकमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असतं. मला नाही वाटत की पोलीस प्रशासनाकडून कोणत्या चुकीच्या गोष्टी घडल्या असतील, असं महेश शिंदे म्हणाले.



## देशाला दिशा अन् विचार देणारा महाराष्ट्र दिशाहिन : रोहित पवार

**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी नाशिकच्या भोंदू अशोक खरात व त्याच्या नादाला लागलेल्या राजकारण्यांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. एआयमुळे रोजगाराचा प्रश्न दिवसागणिक गंभीर होत असताना आपले नेते व राज्यकर्ते भोंदूबाबाच्या व त्याच्या ओश्री जलाच्या चक्रात अडकलेत. हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल, असे ते म्हणालेत. नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अडचणीत सापडलेल्या रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री राज्य महिला आयोगाच्या आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपण आपल्या वैयक्तिक कारणांमुळे स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले. आता त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन अटकेची टांगती तलवार उभी राहिली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



### ब्रेकिंग न्यूज

#### भारत चीन संबंध अधिक दृढ होणार

मुंबई (दै. संध्या) : भारत आणि चीन दरम्यानची हवाई वाहतूक आता पूर्ववत होत आहे. नवी दिल्ली आणि चीनची राजधानी बीजिंग दरम्यानची विमानसेवा लवकरच पुन्हा सुरू होणार आहे. भारतातील चिनी दूतावासाच्या प्रवक्त्या यू जिंग यांनी पुष्टी केली आहे की, ही विमाने थेट असतील. प्रवक्त्यांच्या म्हणण्यानुसार, एअर चायना ही विमानसेवा चालवणार आहे. चिनी दूतावासाच्या प्रवक्त्यांनी याचे वर्णन केवळ प्रवासच नव्हे, तर व्यापार, पर्यटन आणि विश्वास पुनर्संचयित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल असे केले आहे. त्यांनी याला एससीओ आणि ब्रिक्स देशांमधील लोकांमधील संपर्क वाढवण्यासाठी मिळालेला हिरवा कंदील म्हटले आहे. गेल्याच महिन्यात, शांघाय आणि दिल्ली, चीन दरम्यानची थेट विमानसेवा पुन्हा सुरू झाली होती. भारत आणि चीनमधील या शहरांदरम्यान सहा वर्षांतील ही पहिली थेट विमानसेवा होती. एअर इंडियाचे पहिले विमान नवी दिल्लीहून शांघायच्या पुडोंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले, ज्यात २३० प्रवासी होते.

#### भाजपची तिसरी यादी जाहीर

मुंबई (दै. संध्या) : भाजपने २०२६ च्या केरळ विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत ११ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक समितीने या नावांना अंतिम मंजुरी दिली आहे. या यादीनुसार, पेरुमाडे मतदारसंघासाठी व्ही. रतीश आणि पुथुप्पल्लीसाठी रवींद्रनाथ वक्कट्थानम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने आपल्या तिसऱ्या यादीत प्रामुख्याने दक्षिणेकडील जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. पक्षाने तिरुवनंतपुरम, कोवलम, पुथुपल्ली आणि चावरा यांसारख्या जागांवर उमेदवार उभे केले आहेत. पक्षाने अनुसूचित जाती (SC) जागांसाठीही उमेदवारांची घोषणा केली असून, यातून सामाजिक संतुलन राखण्याचे पक्षाचे प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतात.

#### बाथरूममध्ये फुटला टूथब्रश

मुंबई (दै. संध्या) : मोबाईल, ईव्ही, ई-बाईक यांना आग लागल्याच्या बातम्या अधूनमधून येत असतात. पण ताजी घटना टूथब्रशच्या स्फोटाची आहे. एका महिलेने ही माहिती न्यूयॉर्क टाइम्सला दिली आहे. बाथरूममध्ये इलेक्ट्रिक टूथब्रश होता. या टूथब्रशचा स्फोट झाला. सुदैवाने त्यावेळी बाथरूममध्ये कोणीही नव्हते त्यामुळे कोणीही जखमी झालेले नाही. पण बाथरूममध्ये असलेला आरसा तसेच इतर काच सामना फुटून सर्वत्र काचांचा खच झाला. शार्लोट बोवर्स नावाची ३३ वर्षांची महिला मागील आठ महिन्यांपासून इलेक्ट्रिक टूथब्रश वापरत होती. ती कधीच रात्री झोपताना ब्रश चार्ज करण्यासाठी ठेवत नव्हती. जेव्हा घटना घडली त्यावेळी परिसरातील वीज प्रवाह खंडीत झालेला होता. वीज प्रवाह पुन्हा सुरू झाला आणि थोड्याच वेळात बाथरूममधून स्फोटासारखा आवाज आला.

# अशोक खरात प्रकरण : मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

### भास्कर जाधवांचा दावा

**मुंबई (दै. संध्या)**

भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वीच एसआयटी नेमली. पण निम्मे मंत्रिमंडळ यात अडकण्याची शक्यता असल्याने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाला, असा खळबळजनक दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार भास्कर जाधव यांनी केला आहे. नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अडचणीत सापडलेल्या रुपाली चाकणकर यांनी आपल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आता त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन अटकेची टांगती तलवार उभी राहिली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार भास्कर जाधव यांनी उपरोक्त दावा केला आहे. ते म्हणाले, रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेतला हे चांगलेच झाले. पण हे प्रकरण केवळ त्यांच्यापुरतेच मर्यादित नाही. या प्रकरणात अनेक उच्चपदस्थ अधिकारी आहेत. भास्कर जाधव म्हणाले, अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वीच एसआयटी नेमण्यात आली. पण निम्मे मंत्रिमंडळ यात असल्याने हे प्रकरण बाहेर येऊ द्यायचे नव्हते. केवळ पत्रकार व पीडित महिलेमुळे हे प्रकरण बाहेर आले. अन्यथा हे प्रकरण सरकारने केव्हाच दाबले असते. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही एसआयटी केव्हा स्थापन केली? याची माहिती द्यावी. सरकारने अधिवेशन काळात या प्रकरणाची वस्तुस्थिती मांडणे गरजेचे होते. कारण, यात फक्त रुपाली चाकणकर किंवा इतर राजकीय पुढारी आहेत असे नाही. यात उच्चपदस्थ अधिकारीही आहेत. अशोक खरातची उठबस करण्यात ते गुंतलेत. त्यामुळे केवळ चाकणकरांचा राजीनामा घेऊन सरकारने या विषयावरील लक्ष इतरत्र वळवू नये. राजीनामा झाला म्हणजे हे प्रकरण संपणार नाही. सरकारमधील अनेक मंत्री व अधिकारी यात असल्यामुळे हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रकरणात आयएएस, आयपीएस अधिकारी असल्याचे पोलिसांनाही ठावूक होते. आता हे प्रकरण तडीस जावे असा आमचा प्रयत्न आहे. पण सरकारची एकूण वृत्ती पाहता या प्रकरणात काही पुढारी व अधिकाऱ्यांच्या फायली आपल्या बुडाखाली दाबून त्यांचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी केला जाईल, असे ते म्हणाले. भास्कर जाधव पुढे म्हणाले, राजकीय पुढाऱ्यांना अघोरी विद्या व अघोरी प्रकार का लागतात हे कळत नाही. फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेऊन असे शेण खाणाऱ्या लोकांना चांगला धडा शिकवला पाहिजे. या सरकारकडून आम्हाला कोणतीही अपेक्षा नाही. आमचा महाराष्ट्र पुरोगामी असल्याचे आम्ही सांगतो. आम्ही छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज म्हणून उर बडवतो.



अंधश्रद्धा निर्मुलनाचे कायदे करतो. आणि दुसरीकडे हे काय सुरू आहे याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. या प्रकरणाचे धागेदोर खोलवर गुंतले असून, राज्यकर्ते अनेकांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत.

# संपादकीय

## युद्धकाळातही इस्रायल आनंदी देशांत 'टॉप टेन'!

जगातला सर्वांत आनंदी देश कोणता? आणि जगातला सर्वांत दु:खी देश कोणता? या यादीत भारत किंवा आपला देश कुठल्या स्थानावर आहे? ही माहिती जाणून घेण्याची जगभरातील अनेकांना उत्सुकता असते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र दरवर्षी जाहीर करीत असलेला 'वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट' आणि त्याच्या निष्कर्षाकडे अनेकांचं लक्ष लागून असतं. सध्याच्या युद्धकालीन परिस्थितीत तर आनंदाची सगळीच परिमाणं बदललेली आहेत. त्यामुळेच अनेकांचं या रिपोर्टकडं लक्ष लागून होतं. गेली अनेक वर्ष फिनलंड या यादीत पहिल्या स्थानावर आहे. २०२६च्या अहवालातही त्यांनी पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावलं आहे. जगातल्या सर्वाधिक आनंदी देशांतील पहिले दहा देश आहेत फिनलंड, आइसलंड, डेन्मार्क, कोस्टा रिका, स्वीडन, नॉर्वे, नेदरलँड, इस्रायल, लक्झेंबर्ग आणि स्वित्झर्लंड. भारत या यादीत ११६व्या क्रमांकावर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ओढग्रस्तीनं आणि आर्थिक संकटांनी त्रस्त असलेल्या पाकिस्तानचा क्रमांक मात्र भारतापेक्षा वर आहे. असं असलं तरी या अहवालात सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते इस्रायलनं. गेल्या काही वर्षांपासून हा देश संघर्षातून जातो आहे. आधी हमासबरोबर आणि आता इराणबरोबर त्यांचं युद्ध सुरू आहे. तरीही या देशानं जगातल्या 'टॉप टेन' आनंदी देशांमध्ये आपला क्रमांक यंदाही कायम राखला आहे. गेल्या काही वर्षांत इस्रायल सातव्या ते नवव्या क्रमांकाच्या दरम्यान फिरत होता. २०२३ आणि २०२४च्या सुमारास त्याचा क्रमांक आठवा होता. आधीपासूनच तो 'टॉप टेन'मध्ये मजबूतपणे टिकून होता. मात्र यंदाही त्यानं आपली ही जागा कायम ठेवली असल्यानं अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. साहजिकच अनेकांना हा प्रश्न पडला की, सतत संघर्ष, दहशतवादी हल्ले आणि युद्धजन्य परिस्थिती असतानाही एखादा देश 'आनंदी' कसा राहू शकतो? याचं उत्तर या अहवालाच्या मोजमापाच्या पद्धतीत दडलं आहे. 'वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट' हा केवळ बाह्य परिस्थिती किंवा युद्धावर आधारित नसतो, तर नागरिकांचं वैयक्तिक समाधान, सामाजिक आधार, सरकारवरचा विश्वास, आरोग्य, आर्थिक स्थिरता आणि जीवनमान यावर तो अवलंबून असतो. इस्रायल गेल्या काही काळापासून मोठ्या आव्हानांना तोंड देत असला तरी तिथली आरोग्यव्यवस्था अत्यंत मजबूत आहे, लोकांचं उत्पन्न उच्च पातळीवर आहे, देशानं तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड प्रगती केली आहे.



त्याचबरोबर तिथे सामाजिक एकजूट मोठ्या प्रमाणावर दिसते. संकटाच्या काळात लोक एकमेकांना मदत करतात. आपल्याला काहीही झालं, आपला देश कितीही संकटात असला तरीही आपण एकटे पडणार नाही आणि समाज, सरकार आपल्या पाठीशी उभं राहील हे त्यांना ठाऊक आहे. हीच भावना त्यांच्या आनंदाच्या पातळीला आधार देते. दुसरी महत्त्वाची गोष्ट 'रेझिलिअन्स'- म्हणजेच प्रतिकूल परिस्थितीतून सावरण्याची क्षमता. इस्रायलचे नागरिक अनेक दशकांपासून संघर्षाला सामोरे जात आहेत, त्यामुळे मानसिकदृष्ट्या ते अधिक सक्षम झाले आहेत. म्हणूनच बाह्य संकट आलं तरी त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील समाधानावर त्याचा तितका परिणाम होत नाही. उलट, संकटात एकजूट वाढते आणि समाज अधिक मजबूत बनतो. याउलट, अनेक विकसित देशांमध्ये आर्थिक प्रगती असूनही सामाजिक एकटेपणा, तणाव आणि सोशल मीडियाचा वाढता प्रभाव यामुळे आनंदाची पातळी घसरताना दिसते.

## संस्कृत सुभाषित

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफल हेतूर्भूमातेसंगोस्त्व कर्मणि ॥ (भगवद्गीता)

अर्थ – तू फक्त कर्माचा अधिकारी आहेस, कर्म करणे हेच तुझ्या हाती आहे. त्या कर्मातून फळाची अपेक्षा धरू नको. फळ मिळो वा न मिळो, तुला कर्म केलेच पाहिजे आणि फळ मिळत नाही म्हणून कर्मच न करण्याची इच्छा तू बाळगू नको. तू कर्म करीतच रहा.

## गुरु वचन

### आनंदी राहण्याचा निर्णय घ्या

आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## उपदेशकथा

### युक्ती

एकदा एका सिंहाने आणि गाढवाने भागीदारीत शिकार करण्याचे ठरवले. हिंडता हिंडता ते रानटी मेंढराच्या एका गुहेपाशी आले. सिंह गाढवाला म्हणाला, 'आपण असे करूया, मी गुहेच्या बाहेर उभा राहतो. तू आत जाऊन जोरजोरात ओरडायला सुरुवात कर. सगळ्या रानटी मेंढ्या घाबरून बाहेर येतील आणि मग मी त्यांचा फडशा पाडतो', असे म्हणून सिंह बाहेर गुहेच्या दारापाशी पाळतीवर राहिला.

गाढवालाही सिंहाची युक्ती पटली आणि त्याने आत घुसून मोठ्याने खिंकाळण्यास सुरुवात केली. रानटी मेंढ्या गाफील होत्या, त्यांना असा हल्ला अपेक्षितच नव्हता. नंतर त्याने आत जोरदार गोंधळ माजविला की, त्यामुळे सर्व मेंढेर बाहेर पडली आणि आयतीच सिंहाच्या तावडीत सापडली. सिंहाने बहुतेक सर्वांना पकडून मारले.

शेवटी गाढव बाहेर आला आणि दमून धापा टाकत सिंहाला म्हणाला, काढलं की नाही सगळ्यांना बाहेर? कसं काय वठलं नाटक?' 'अरे, विचारतोस काय?' सिंह खो खो हसत म्हणाला, 'खरं सांगायचं म्हणजे तू गाढव आहेस, हे मला माहीत नसते तर स्वत: मीसुद्धा तुला घाबरलो असतो पण यातील मांसाचा एकही तुकडा तुला मिळणार नाही आणि जास्त बोलशील तर तुलाही खाऊन टाकेन. जा इथून.' गाढवाला कळून चुकले की पोकळ बढाया कुठेही चालत नाहीत. त्यामुळे नुसती दामछाक होते.

कथा उपदेश : खोट्या बढायांनी काही साध्य होत नाही, तर फजितीच होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:वणिज १०:३६:५९ |
| २२ मार्च २०२६ | करण:विष्टि २१:१६:५१ |
| रविवार | सूर्य:मीन |
| विक्रम संवत्- २०८२ | चन्द्र:मेष |
| चैत्रशके संवत्- १९४७ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – शव्वाल |
| अयन- उत्तरायणारंभ | तारीख – २ |
| मास- चैत्र | विशेष |
| ऋतु- सौर वसंत | विनायक चतुर्थी |
| शुक्ल पक्ष | भारतीय चैत्र मासारंभ |
| तिथि:चतुर्थी २१:१६:५१ | शके १९४८ प्रारंभ |
| नक्षत्र:भरणी २२:४२:२४ | गोमाजी महाराज यात्रा |
| योग:वैधृति १५:४१:०६ | – नागझरी (अकोला) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 6 | | | 1 | 8 | 3 | | |
| 4 | | 3 | | | 6 | 9 | 2 | |
| | 1 | 7 | | | | | | |
| | 9 | | 8 | 2 | | | | |
| | 2 | 4 | 5 | | 3 | 6 | 9 | |
| | | | | 6 | 9 | | 1 | |
| | | | | | | 8 | 5 | |
| | 7 | 5 | 1 | | | 4 | | 9 |
| | | 2 | 6 | 8 | | | 3 | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८९३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 2 | 5 | 7 |
| 7 | 5 | 2 | 9 | 6 | 8 | 3 | 4 | 1 |
| 1 | 3 | 4 | 2 | 7 | 5 | 9 | 8 | 6 |
| 5 | 7 | 1 | 8 | 9 | 2 | 6 | 3 | 4 |
| 3 | 9 | 6 | 4 | 5 | 7 | 1 | 2 | 8 |
| 4 | 2 | 8 | 6 | 3 | 1 | 7 | 9 | 5 |
| 8 | 4 | 3 | 1 | 2 | 6 | 5 | 7 | 9 |
| 9 | 1 | 5 | 7 | 8 | 3 | 4 | 6 | 2 |
| 2 | 6 | 7 | 5 | 4 | 9 | 8 | 1 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८९५ – ल्युमिअर बंधूंनी पहिला चलतचित्रपट पॅरिस येथे प्रदर्शित केला.
- १९०३ – दुष्काळामुळे नायगरा धबधब्याच्या अमेरिकन बाजूचे पाणी आटून त्या बाजूचा धबधबा पडणे बंद झाले.
- १९०४ – अमेरिकेतील्या दैनिक 'इलेस्ट्रेटेड मिरर' मध्ये वृत्तपत्रातली पहिली रंगीत चित्रे प्रसिद्ध झाली.
- २००७ – संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस बान की मून इराकचे पंतप्रधान नूरी अल मलिकी यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषदेदरम्यान झालेल्या बॉम्बस्फोटातून सुदैवाने बचावले.

### राष्ट्रीय

- १९२८ – महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे अंक स्वतंत्रपणे प्रकाशित होऊ लागले. त्या आधी पत्रिका विविध ज्ञानविस्ताराचे परिशिष्ट या स्वरुपात प्रकाशित होत असे.
- १९४७ – अखेरचे ब्रिटीश व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांचे भारतात आगमन.
- १९५५ – भारत-ब्रह्मदेशदरम्यान रेडिओ-दूरध्वनी सेवा सुरू झाली.
- १९५७ – भारतीय राष्ट्रीय पंचांगाची सुरुवात.
- १९७० – मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना.

### जन्म

- १९१० – 'द क्रुएलसी' या कादंबरीच्या कादंबरीकार निकोलस मोन्सारट यांचा जन्म.
- १८२२ – तुर्कीचे शिक्षणमंत्री अहमद पाशा यांचा जन्म.
- १८२२ – नेदरलंडचे पंतप्रधान इसाक डी. फ्रांसेन यांचा जन्म.

### निधन

- १८३२ – योहान वुल्फगँग फॉन गोएथे (गटे) यांचे निधन. त्याने संस्कृत साहित्याचा परिचय युरोपला घडविला.

## : SMS :

Naughty thought for the day - "It is really hard to wait for the right person in life. Especially when... The wrong ones are damn attractive!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३० | १८.८ |
| अहमदनगर | ३०.४ | १८.८ |
| अकोला | ३१.७ | २२.३ |
| अमरावती | ३१ | २१.८ |
| बीड | ३२ | २१.७ |
| भंडारा | ३०.८ | २०.१ |
| बुलढाणा | १८.६ | १४.६ |
| चंद्रपूर | ३२ | २२ |
| चेन्नई | ३७.२ | २५.६ |
| नवी दिल्ली | २०.८ | १६.९ |
| धुळे | ३०.६ | २०.९ |
| गोंदिया | ३०.१ | २०.३ |
| जळगाव | ३१.५ | २०.८ |
| कोल्हापूर | ३१.७ | १८.३ |
| लातूर | ३०.६ | १९.८ |
| मुंबई | ३१.५ | २५.२ |
| नागपूर | ३०.५ | २१.२ |
| नांदेड | ३२.६ | २१.८ |
| नंदूरबार | २८.७ | १९.९ |
| नाशिक | २९.६ | १७.८ |
| पुणे | २९.३ | १६ |
| पंढरपूर | ३२.८ | २१.७ |
| सातारा | ३१.५ | १६.४ |
| सांगली | ३२.२ | २०.१ |
| सोलापूर | ३२.८ | २१.५ |
| वर्धा | ३२ | २१.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** न्याय प्रविष्ठ प्रकरणातून लाभ होतील. थोरा-मोठयांच्या सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लागतील.

**तुळ :** प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. समाजात आपल्या मतांचा आदर होईल.

**वृषभ :** कर्जप्रकरणे मंजूर होतील. जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ-समारंभाचे आयोजन केले जाईल.

**वृश्चिक:** मित्रपरिवाराचे सहकार्य लाभेल. आकर्षक भेटवस्तू मिळतील. सुग्रास भोजनाचे बेत आखले जातील. नवीन परिचय होतील.

**मिथुन :** शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्याल. जाणीवपूर्वक आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा.

**धनु :** व्यवसाय उद्योगात मोठया प्रमाणात गुंतवणूक केली जाईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपल्या व्यावसायिक उत्पन्नाचा दर्जा सुधारला जाईल.

**कर्क :** जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा. सामाजिक क्षेत्रातील आपल्या आघाडीच्या नेतृत्वामुळे समाजात प्रतिष्ठा उंचावेल.

**मकर :** कामाच्या विस्ताराचा सतत ध्यास घ्याल. उधारी उसनवारी वसूल होईल. स्वसंपादीत धनाचा उपभोग घेता येईल. समाधान लाभेल.


**सिंह :** आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. मिळालेल्या संधींचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. आर्थिक आवक वाढेल.

**कुंभ :** व्यवसाय उद्योगाच्या निमित्ताने देशातील तसेच परदेशातील संस्थांशी संपर्क साधण्यात यशस्वी व्हाल. अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**कन्या :** साचेबद्ध जीवनातून विरंगुळा मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घ्याल. अचानक सहलीचे आयोजन केले जाईल.

**मीन :** भावाबहिणींशी वागताना भावनिक उद्रेक होणार नाही याची दक्षता घ्या. जवळचे प्रवास सुखकर होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९४



### आडवे शब्द

१. अचूक उपाय (ला.)
४. दोघे
७. परीक्षा करण्यात नापास!
११. अपेक्षित वेळेनंतर
१२. धार लाव!
१३. अटीची भाषा
१४. मनात उठणारे वादळ
१५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री
१८. खोडसाळ, वात्रट
२०. पिकाचा गाळ
२२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच
२३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री
२४. अस्वल, २५. अल्प
२७. 'जैसे थे' परिस्थिती
२९. मरेपर्यंत, ३१अ. दबाव
३२. लहान
३३. संगीतातील एक राग
३५. हार, सर
३६. वस्ती
३८. भांडणाची कळ
३९. कलावंत
४१. देशाचे नाणे
४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा
४३. मार्गक्रमण
४५. त्वरेने, तत्परतेने
४७. नूतन
४८. नाश पावणारे
५०. आवाजाची गोंधळ
५१. विशेष
५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी
५४. पुन्हा पुन्हा
५७. बाई
५८. मद्य
६०. जुगाराचा एक प्रकार
६१. थेट, सरळ
६३. शुष्कता, तीव्र ऊन
६४. शहाणा, सुंदर
६७. वडील
६९. राख
७२. व्याकूळ, घाबरलेला
७४. पेढ्याचा एक प्रकार
७५. कणीदार
७६. विखारी चेष्टा
७७. शिक्षा

### उभे शब्द

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन
२. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर'
३. नेमका तपशील
४. छाती
५. देवाचे असेल तर ठीक!
६. लकेर
७. समुद्रातील लाटांचा आवाज
८. भरजरी
९. रममाण, निमग्न
१०. कबूतर
१२. एक पंजाबी नाव
१६. ऐन
१७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य
१९. सर्वस्व
२१. लेखक मतकरींचे नाव
२४अ. फळांचे पेय
२५. दोस्त
२६. शरीर
२८. पाताळ
२९. शिव्याशाप
३०. अंकित माणूस, गुप्तहेर
३१. शक्ती, जोर, बळ
३१अ. लाही-लाही
३३. हिमालयातील पांडवकालीन सरोवर
३४. वेडावाकडा
३५. खाणाखुणांवरून पाठलाग
३७. उंट हाकणारा
४०. पापडाच्या पिठाची गोळी
४१. हालचाल
४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
४५. पटापटा
४६. '--- काय अन् फाटक्यात पाय!'
४९. पाठविलेला
५०. ऋणको, कर्ज घेणारा
५१. फुकटचंबूंमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला
५२. सदोदित
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५६. वेतन
५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप
६०. महिरप
६२. पशूंचे ओरडणे
६५. विष
६६. सजावट
६७. विहीर
६८. माहूताकडील शस्त्र
७०. मीठ
७१. पलंग, बाज
७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य

### जम्बो शब्दकोडे क्र. ८९३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर : १.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## मंत्र्यांची चौकशी करा रुपाली चाकणकरांना अटक करा : काँग्रेसचे 'जोडे मारो' आंदोलन

पुणे (दैनिक संध्या) : भोंदूबाबा खरात यांच्याशी संबंध असलेल्या मंत्र्यांची त्वरीत चौकशी करा आणि महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकरांना अटक करा, अशा मागणीसाठी पुणे शहर महिला काँग्रेसच्या वतीने आज शनिवारी सकाळी फर्ग्युसन कॉलेज रोड येथे आंदोलन करण्यात आले. पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. रूपाली चाकणकर यांनी महिलांच्या चारित्र्याशीच खेळ केला, हा गुन्हा अक्षम्य आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा भंग आणि महिलांचे शोषण केलेल्या खरात या भोंदू बाबाला संरक्षण दिल्याबद्दल रुपाली चाकणकरांना अटक झालीच पाहिजे. महाराष्ट्रातील एपस्टीन खरात याची ३० दिवसांत चौकशी करा. तसेच त्या बाबाच्या अनेक गैरकृत्यात सहभागी असलेल्या मंत्र्यांची त्वरीत चौकशी झाली पाहिजे, असे स्वाती शिंदे यांनी मागणी केली. फुले, शाहू, आंबेडकर यांची परंपरा मानणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष पदावरून काढून टाकावे, अशी मागणी स्वाती शिंदे यांनी आंदोलकांच्या वतीने केली. आंदोलन फर्ग्युसन कॉलेज रोड येथे जोषपूर्ण झाले. 'मंत्र्यांनो खुर्चा खाली करा', 'भोंदूबाबा खरातला कडक शासन करा', अशा आशयाच्या घोषणांचे फलक आंदोलकांनी हाती घेतले होते. भोंदूबाबा खरात आणि रुपाली चाकणकर यांच्या प्रतिमांना जोडे मारण्यात आले. पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात अर्चना शाह, अनिता मकवाना, प्राजक्ता जाधव, रेखा जैन, अंजली सोलापूरे, राजश्री दामले-चव्हाण, रुपाली पवार, मनोरमा चौधरी, कल्पना शिंदे, ज्योती अडागळे, अंजली देसाई, सुवर्णा माने, सुरेखा मारणे, गीतांजली तसेच इतर महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आंदोलन यशस्वी केले.

## 'अत्तर' लघुपटाला सांस्कृतिक कलादर्पणमध्ये पाच नामांकने जाहीर



पुणे (दैनिक संध्या) : बहुचर्चित आणि जागतिक स्तरावर दखल घेतलेल्या 'अत्तर' या मराठी लघुपटाने पुन्हा एकदा आपली छाप पाडत २८ व्या सांस्कृतिक कलादर्पण पुरस्कार सोहळ्यात तब्बल पाच नामांकने पटकावली आहेत. या नामांकनांमुळे चित्रपटसृष्टीत 'अत्तर'ची चर्चा अधिक रंगू लागली आहे. या लघुपटाला उत्कृष्ट कथा (रामकुमार शेडगे), उत्कृष्ट बालकलाकार (मीरा शेडगे), उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री (रेवा बर्गे), उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता (विनय सोनवणे) आणि लक्षवेधी लघुपट अशा विविध प्रमुख विभागांमध्ये नामांकने मिळाली आहेत. वेगवेगळ्या तांत्रिक आणि अभिनय क्षेत्रांमध्ये मिळालेल्या या नामांकनांमुळे 'अत्तर'च्या गुणवत्तेची पुन्हा एकदा पुष्टी झाली आहे. 'अत्तर' या लघुपटाची निर्मिती 'द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स' आणि 'रुहाणी म्युझिक' यांनी केली आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रामकुमार शेडगे यांनी केले असून त्यांच्या संवेदनशील आणि वास्तवदर्शी मांडणीमुळे हा लघुपट प्रेक्षकांच्या मनाला भिडला आहे. या आधीही 'अत्तर'ने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार आणि नामांकने मिळवत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध फिल्म फेस्टिव्हल्समध्ये या लघुपटाला मिळालेल्या प्रतिसादामुळे मराठी लघुपटसृष्टीला नवी उभारी मिळत असल्याचे चित्र दिसून येते. दरम्यान, २८ वा सांस्कृतिक कलादर्पण पुरस्कार सोहळा येत्या २ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता सुधागड एज्युकेशन सोसायटी, कळंबोली (मुंबई) येथे दिमाखात पार पडणार आहे. या सोहळ्याचे महत्त्वाचे आयोजक चंद्रशेखर सांडवे असून त्यांनी ही माहिती दिली. आता या सोहळ्यात 'अत्तर' लघुपटाला किती पुरस्कार मिळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्री स्वामींच्या प्रकटदिनानिमित्त विशेष कीर्तन संपन्न



पुणे (दैनिक संध्या) : भक्ती आणि स्वामींची शक्ती यांची जोड आयुष्याला लाभली की जीवनात प्रत्यय येतो आणि आयुष्य सोप्पे होते. त्यासाठी स्वामींच्या 'तारक मंत्र'चा जप श्रद्धेने करा, स्वामींचे आशीर्वाद प्रत्येकाला मिळत राहतील असे प्रतिपादन ह.भ.प. सौ. तन्मयी मेहेंदळे कुलकर्णी यांनी केले. श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्ताने सोनाली अपार्टमेंट, सिंहगड रोड, पुणे, येथे 'स्वामी समर्थ भक्तीमहात्म्य' या विषयावर सुश्राव्य कीर्तन झाले. यावेळी त्या बोलत होत्या . भाजपचे नगरसेवक श्रीकांत जगताप सपत्नीक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यांच्या हस्ते स्वामींची आरती झाली. याप्रसंगी भक्तांनी अलोट गर्दी केली होती. कीर्तनकार सौ. तन्मयी मेहेंदळे कुलकर्णी यांनी कीर्तनात, 'प्रथम जाणे भक्तीचा जिव्हाळा' हा पूर्वरंग आणि स्वामी समर्थ कथा आणि त्या नंतर दामाजी पंत अख्यान म्हणजे उत्तररंग सादर करून सर्व उपस्थितांची, भक्तांची मने जिंकली. याप्रसंगी तबला साथ प्रसिद्ध तबला वादक पंडित विजय दास्ताने यांचे शिष्य जयराज हुंडेकरी यांची लाभली तर हार्मोनियम साथ साहील पुंडलिक यांची लाभली. यावेळी स्वाती वाळके, मनीषा जोशी, नेहा काळे तुंगे, क्षमा शेनितकर, अजय मोरे, अनिकेत कुलकर्णी, सुहास रसाने, स्वप्नील रसाने यांनी प्रकट दिनाची तयारी केली होती. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## समलैंगिक संबंधांना विरोध, 21 महिन्यात 2 अल्पवयीनांची हत्या; तरुणाला अटक

पुणे (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील दोन अल्पवयीन मुलांच्या निघृण हत्याकांडाचा अखेर उलगडा झाला असून, एकाच आरोपीने दोन्ही खून केल्याची धक्कादायक कबुली दिली आहे. समलैंगिक संबंधांना विरोध केल्याच्या कारणावरून हत्या केल्याचे आरोपी अक्षय दत्तात्रेय मांजरे (वय २२, रा. दहिवडी, ता. शिरूर) याने कबूल केल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांनी दिली. या प्रकरणातील ११ वर्षे वयाच्या मुलाची २१ जून २०२४ रोजी आणि १२ वर्षे वयाच्या मुलाची १७ मार्च २०२६ रोजी एकाच पद्धतीने हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी अक्षय मांजरे याला अटक करण्यात आली असून, त्याने दोन्ही खून डोक्यात दगड घालून केल्याची कबुली दिली आहे. शिक्रापूर पोलिसांनी आरोपीला घटनास्थळी नेऊन शेतातून महत्त्वाचे पुरावे हस्तगत केले आहेत. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील हत्या झालेली मुले अल्पवयीन आहेत.

# पुण्यात "राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा २०२६" उत्साहात

### कर्तृत्ववान शेतकरी व समाजसेवकांचा सन्मान



पुणे (दै. संध्या) :

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे आयोजित "राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा 2026" पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कृषी क्षेत्र, समाजकार्य, ग्रामीण विकास आणि शेतीसंबंधित विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सिने अभिनेत्री नेहा पटिले आणि अपूर्वा परदेशी उपस्थित राहिल्या. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष आकर्षण प्राप्त झाले. संस्थेचे अध्यक्ष गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी स्वप्निल पवार (वन वे इंटरटेनमेंट), कृषी अधिकारी एस. एस. सावंत यांच्यासह अनेक उद्योजक, कृषी तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून सेंद्रिय शेती, शाश्वत शेती पद्धती, जलसंधारण, पशुपालन, महिलांचे सक्षमीकरण आणि कृषी उद्योजकता या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना "राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2026" प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष गणेश विटकर म्हणाले, "महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी हा आपल्या देशाचा खरा हिरो आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे समाजाची प्रगती आणि अन्नसुरक्षा शक्य झाली आहे. शेतकऱ्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आणि अभिमान आहे." या कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबिरे, कृषी उद्योजकतेसाठी प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांसाठी अ‍ॅग्री-इनोव्हेशन स्पर्धा तसेच राज्यभर "शेती प्रेरणा अभियान" राबवण्याची घोषणाही करण्यात आली.

एकूणच हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारा आणि शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

## जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक : डॉ. हुलगेश चलवादी

*पुरोगामी महाराष्ट्रात श्रद्धेच्या नावाखालील फसवणूक थांबवण्याचे आवाहन*

पुणे (दै. संध्या) :



संतांची आणि समाजसुधारकांची भूमी असलेल्या महाराष्ट्राने देशाला पुरोगामी विचारांची दिशा दिली.मात्र,आजही विज्ञानाच्या युगात अनेक नागरिक श्रद्धेच्या नावाखाली ढोंगी बाबा आणि मांत्रिकांच्या जाळ्यात अडकून स्वतःचे आर्थिक, शारिरिक आणि मानसिक नुकसान करून घेत आहेत, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. नागरिकांनी देव, धर्मावर श्रद्धा जरूर ठेवावी, पण अंधश्रद्धेला बळी पडू नये, असे आवाहन राज्यात गाजत असलेल्या 'कॅप्टन' प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बहुजन चळवळीतील नेते व माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी शनिवारी (ता.२१) केले. राज्यात अस्तित्वात असलेल्या जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.

राज्यात जादूटोणाविरोधी कायदा अस्तित्वात असूनही हजारो गुन्हे दाखल होणे आणि शेकडो ढोंगी बाबांना अटक होणे हे दर्शवते की, समाज अजूनही या भोंदूगिरीच्या विळख्यात आहे. भक्ती, श्रद्धा ही वैयक्तिक बाब आहे; परंतु, जेव्हा एखादा व्यक्ती चमत्काराचा दावा करून तुमचे आजार बरे करण्याचे, गुप्तधन मिळवून देण्याचे, पैशांचा पाऊस पाडण्याचे किंवा संकट दूर करण्याचे आमिष दाखवतो, तेव्हा ती शुद्ध फसवणूक असते. अशा भोंदूगिरीला नागरिकांनी थारा देऊ नये, असे आवाहन देखील डॉ.चलवादी यांनी केले.

केवळ गुन्हे दाखल करून अंधश्रद्धा निर्मूलन होणार नाही. राज्य सरकारने तालुका,गाव पातळीवर मोठ्या प्रमाणावर 'जनजागृती अभियान' राबवण्याची गरज आहे. शाळा-महाविद्यालयांमधून वैज्ञानिक दृष्टिकोनाचे धडे दिले पाहिजे.ढोंगी बाबांना आणि मांत्रिकांना कायद्याचा धाक वाटला पाहिजे. अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करून समाजात एक आदर्श निर्माण करणे गरजेचे असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला तर्कशुद्ध विचार करायला शिकवले. स्वतःच्या कष्टावर विश्वास ठेवा, कोणत्याही मांत्रिकाच्या शब्दावर नाही.आपल्या राज्याला पुरोगामी म्हणवून घेताना जर आजही लोक बाबा-बापूंच्या नादाला लागून उद्ध्वस्त होत असतील, तर ते आपल्या सर्वांचे वैचारिक अपयश आहे. सर्वांना मिळून एक वैज्ञानिक-विवेकनिष्ठ समाज घडण्याची गरज यानिमित्ताने निर्माण झाली असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## पिंपरी-निगडी मेट्रो जानेवारीपर्यंत पूर्ण होणार

पुणे (दै. संध्या) :

विधिमंडळाच्या अधिवेशनात पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो, पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, नदी सुधार, पर्यटन विकास, पर्यावरण यासह दहा प्रश्नांवर विधान परिषदेतील आमदार उमा खापरे यांनी लक्षवेधी मांडली. त्यावर पिंपरी ते निगडी मेट्रोचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे. तसेच पवना आणि भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याचा प्रयत्न आहे, असे उत्तर मंत्री उदय सामंत यांनी दिले. आ. खापरे म्हणाल्या की, पिंपरी ते निगडी मेट्रोचे काम संथगतीने चालू आहे. शहराची लोकसंख्या ४० लाखांवर पोहोचली असून, ७५० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. मात्र, ६२० एमएलडी पाणी मिळत आहे. त्यामुळे प्रलंबित पाणीपुरवठ्याचे प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. प्रॉपर्टी कार्ड, न्यायालय इमारत व अन्य प्रश्न तातडीने सोडवण्याची गरज आहे. मंत्री सामंत म्हणाले की, जानेवारीपर्यंत पिंपरी-निगडी मेट्रोचे काम पूर्ण होईल. मुळा नदी सुधार योजनेचे काम ९३ टक्के झाले आहे. पवना आणि इंद्रायणी नदीला निधी मंजूर झाला आहे. भामा-आसखेड प्रकल्प संथगतीने सुरू होता. त्यामुळे ठेकेदाराला निलंबित केले आहे. पवना धरणातून बंदिस्त पाइपलाइनद्वारे ५२० आणि आंध्रा धरणातून शहरासाठी १०० असे एकूण ६२० एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन आहे.

## 'मी मराठी' मधून महाराष्ट्राची संस्कृती आणि संस्कारांचे दर्शन

पुणे (दै. संध्या) :

वासुदेव, जागरण गोंधळ, जात्यावरची गाणी, धनगर गीत, कोळी गीत अशी मराठमोळी संस्कृती नृत्य, नाट्य आणि गायनाच्या माध्यमातून पुणेकरांसमोर उलगडली. सह्याद्रीच्या कडेकपारी... या देशाची अमृतवाणी...मी मराठी, शिवरायांची दिव्य आठवण... तुमचे अमुचे एक जागरण... मी मराठी असे सांगत नंदेश उमप यांच्यासह ७५ कलाकारांनी सादरीकरण केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे गणपती मंदिराच्या ४३ व्या वर्धापनदिनानिमित्त गुढीपाडव्यापासून नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर्स तर्फे नंदेश वत्सला विठ्ठल उमप प्रस्तुत 'मी मराठी' कार्यक्रमात नंदेश उमप आणि ७५ कलाकारांनी सादरीकरण केले. यापूर्वी पं.उपेंद्र भट आणि सहकाऱ्यांचा गुरु गणेश हा सांगीतिक कार्यक्रम देखील झाला. निराकार



■ नंदेश उमप आणि ७५ कलाकारांचे सादरीकरण ; श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचा ४३ वा वर्धापनपदिनानिमित्त संगीत महोत्सव

ओंकार निर्गुण रूप... या गीताच्या सादरीकरणाने कार्यक्रमाचा श्री गणेशा झाला. संत, साहित्यिक आणि कवींच्या कविता सादर करीत मराठी भाषेचे जागरण यानिमित्ताने करण्यात आले. हृदयस्पर्शी अभंग, शेतकरी गीतांप्रमाणेच पोतराजाने केलेली जनजागृती आजच्या पिढीला सांगण्याकरिता झालेले सादरीकरण उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरले. होळी, रंगपंचमी सारख्या सणांची माहिती आणि महती देखील कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून उपस्थितांसमोर ठेवली.

## दक्षिण भारतानंतर महाराष्ट्रात पहिल्यांदाच EPIQ सिनेमा लॉन्च

### पुण्यातील हिंजवडी येथे ई-स्क्वेअर मल्टीप्लेक्सचे भव्य उद्घाटन

पुणे (दै. संध्या) :

क्यूब सिनेमा ने आज पुण्यातील ई-स्क्वेअर सिनेमाजमध्ये आपल्या प्रीमियम लार्ज फॉरमॅट सिनेमा EPIQ च्या लॉन्चची घोषणा केली. हे पाऊल त्यांच्या लार्ज-फॉरमॅट सिनेमा अनुभवाच्या विस्तारासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. 2019 पासून दक्षिण भारतात प्रेक्षक आणि तंत्रज्ञांकडून मोठी प्रशंसा मिळवल्यानंतर, EPIQ आता पहिल्यांदाच महाराष्ट्रात प्रवेश करत आहे, ज्यामुळे आपल्या विशेष तंत्रज्ञान, भव्यता आणि इमर्सिव अनुभवासह भारतातील सर्वात गतिमान सिनेमा बाजारांपैकी एका बाजारात पदार्पण करत आहे.

सुल्लूरपेट, कोयंबटूर, कोझिकोड, मदुरै, तंजावूर, हैदराबाद, त्रिशूर, राजापालयम आणि चेन्नई यांसारख्या दक्षिण भारतातील प्रमुख शहरांमध्ये यशस्वी स्थापना केल्यानंतर, पुण्यातील लॉन्च हा EPIQ च्या राष्ट्रीय विस्तारातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे भारतीय प्रेक्षकांमध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि इमर्सिव थिएटर अनुभवासाठी वाढती मागणी देखील दर्शवते.



ई-स्क्वेअर सिनेमाजमधील EPIQ ऑडिटोरियम मोठ्या प्रमाणात, उत्कृष्ट दृश्य स्पष्टता आणि प्रेक्षकांच्या सोयी लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आले आहे. यात भिंतीपासून भिंतीपर्यंत मोठी स्क्रीन, स्टेडियम-शैलीतील आसन व्यवस्था आणि प्रत्येक सीटवरून उत्कृष्ट अनुभव देणारे वातावरण आहे. पुण्यातील EPIQ मध्ये Barco 4K RGB लेझर प्रोजेक्शन, Dolby Atmos इमर्सिव साउंड आणि 1.89:1 स्क्रीन रेशो यांसारख्या प्रीमियम तंत्रज्ञानांचा समावेश आहे, जे फ्लॅट आणि स्कोप दोन्ही फॉरमॅटसाठी योग्य आहे. यामुळे उच्च ब्राइटनेस, उत्तम कॉन्ट्रास्ट, अचूक रंग आणि उत्कृष्ट ध्वनी अनुभव मिळतो. चित्रपटांना क्यूबद्वारे विशेषतः EPIQ साठी ऑप्टिमाइझ केलेल्या डिजिटल सिनेमा पॅकेजेस (DCPs) मध्ये तयार केले जाते, ज्यामुळे मोठ्या फॉरमॅटमध्ये उत्तम गुणवत्ता मिळते. क्यूब सिनेमा चे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्ष रोहतगी म्हणाले:"EPIQ ची सुरुवात दक्षिण भारतात झाली आणि वर्षानुवर्षे ते प्रीमियम सिनेमाचे मानक बनले आहे. पुणे आणि पश्चिम भारतात ते आणणे हा आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे ते प्रादेशिक नसून राष्ट्रीय ब्रँड बनत आहे. ई-स्क्वेअर हा आमच्यासाठी आदर्श भागीदार आहे." ई-स्क्वेअर लीजर प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत पंचामिया म्हणाले: "ई-स्क्वेअर सिनेमाजमध्ये आमचा उद्देश नेहमीच प्रेक्षकांना सर्वोत्तम अनुभव देणे हा आहे. EPIQ आमच्या मूल्यांचे — भव्यता, तंत्रज्ञान आणि सिनेमाचा जादू — प्रतीक आहे. महाराष्ट्रातील पहिल्या मल्टीप्लेक्सपैकी एक म्हणून आम्हाला हा नवीन अनुभव पुण्यात आणताना आनंद होत आहे."


EPIQ हा क्यूब सिनेमा द्वारा विकसित केलेला प्रीमियम लार्ज फॉरमॅट सिनेमा संकल्पना आहे. यात Barco उच्च-कॉन्ट्रास्ट RGB लेझर प्रोजेक्शन, 1.89 स्क्रीन रेशो आणि इमर्सिव साउंड तंत्रज्ञान वापरले जाते. कंटेंट 4K रिझोल्यूशनमध्ये तयार केला जातो आणि उच्च गुणवत्तेसाठी विशेष ग्रेडिंग केली जाते.या सिनेमातील प्रत्येक घटक — आसन व्यवस्था, दृश्य कोन, ध्वनी आणि प्रकाश — असा डिझाइन केला आहे की प्रत्येक सीटवरून सर्वोत्तम अनुभव मिळेल. पहिला EPIQ स्क्रीन 2019 मध्ये आंध्र प्रदेशातील सुल्लूरपेट येथे लॉन्च झाला होता.

# चेटीचंड महोत्सवातून सिंधी संस्कृती, सामाजिक एकतेचे दर्शन

### सिंधू सेवा दलातर्फे भगवान साई झुलेलाल यांचा १०७६ वा जन्मोत्सव व सिंधी नववर्षाचा आनंदोत्सव साजरा

पुणे (दै. संध्या) :

'आयो लाल झुलेलाल'च्या जयघोषात भगवान साई झुलेलाल यांची भक्तीभावाने केलेली आरती... झुलेलाल यांच्या मनमोहक प्रतिमेचे पूजन... सिंधी गीतांची बहारदार मैफल... कलात्मक नृत्याविष्कार... चाट-सामोसा-गोड भाताचा प्रसाद... रुचकर लंगर... डोक्यावर लाल टोपी आणि साई झुलेलाल यांचे 'लाल झुले लाल झुले लाल झुलेलाल' हे अखंड भजन अशा भावभक्तीमय वातावरणात सिंधी संस्कृतीचे दर्शन घडले. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ५००० पेक्षा अधिक आबालवृद्धांनी या महोत्सवात सहभागी होत सिंधी समाजाच्या एकतेचे दर्शन घडवले.



सिंधी समाजाचे नवीन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या १०७६ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सव आयोजिला होता. येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या बँक्वेट हॉल व मैदानावर झालेल्या या महोत्सवात सहभागी प्रत्येक सिंधी बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात झाली. संगीत, गायन, भजन आणि महाप्रसादातील विविध पदार्थ आणि खास महिलांचाच सहभाग असलेल्या म्युझिक बँडचे सादरीकरण यामुळे यंदाचा चेटीचंड महोत्सव वैशिष्ट्यपूर्ण ठरला. गायिका, वादक, कीबोर्ड प्लेयर, ड्रमर अशा प्रत्येक भूमिकेत महिला कलाकारांनी आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवत 'नारी शक्ती'चा प्रभावी आविष्कार घडवला.

विविध शहरातील १६ सिंधी महिला कलाकारांनी एकत्र येऊन हा म्युझिक बँड सुरु केलेला असून, महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने त्यांना सांस्कृतिक सादरीकरणाची संधी देण्यात आली. सिंधी ऑर्केस्ट्राचा लाईव्ह कॉन्सर्ट उपस्थितांनी अनुभवला. जनरेशन नेक्स्ट डान्स अकादमीतर्फे आकर्षक नृत्यकलेचे सादरीकरण झाले. प्रीतिभोजने (महाप्रसाद) महोत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सिंधी स्टँड-अप कॉमेडियन आणि अभिनेता मोहित शेवानी यांनी केले. त्यांच्या प्रभावी शैलीने कार्यक्रमात रंगत आणली.

न्यूज १८ चे व्यवस्थापकीय संचालक किशोर आजवानी यांच्या हस्ते साई झुलेलाल यांची महाआरती झाली. उद्योजक मनोज मोटवानी यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष सचिन तलरेजा, माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी, अशोक वासवानी, दीपक वाधवानी, विजय दासवानी, सचिव राजेंद्र फेरवानी, खजिनदार जय पिंजानी, जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी उपस्थित होते.

सचिन तलरेजा म्हणाले, "सिंधी संस्कृती विषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासह सिंधी परंपरा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सिंधू सेवा दल गेली ३९ वर्ष कार्यरत आहे. चेटीचंड महोत्सवानिमित्त सर्व समाज एकत्र येतो. भगवान साई झुलेलाल यांचा उत्सव साजरा करतो. हा आनंदाचा क्षण अनुभवण्यासाठी आम्हीही दरवर्षी यामध्ये सहभागी होतो."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अन्विताने जिंकली स्वातंत्र्याची लढाई, सोनी सबच्या इत्ती सी खुशी मध्ये

मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सबचा शो इत्ती सी खुशी अन्विता (सुम्बुल तौकीर खान) च्या प्रवासाची कहाणी सांगतो, एक तरुणी जी आपल्या भावंडांसाठी आयुष्याच्या कठीण प्रसंगांमध्येही ठामपणे उभी राहते. शो आता भावनिक आणि परिवर्तनकारी टप्प्यात प्रवेश करतो, जिथे अन्विताची भावंडांच्या कस्टडीसाठी आणि विषारी लग्नातून मुक्त होण्यासाठीची लढाई निर्णायक क्षणी पोहोचते. आगामी भागांमध्ये कोर्टरूम ड्रामा एका शक्तिशाली निकालावर संपतो. अडथळे आणि कठोर अटी असूनही अन्विताचा निर्धार कधीच ढळत नाही. संजय (ऋषी सक्सेना) च्या कपटी वर्तनाचा सत्य अखेर उघड होतो जेव्हा माधुरी (उत्कर्षा नाईक) त्याच्याविरुद्ध साक्ष देते, हे सिद्ध करते की तो मुलांची काळजी घेण्यासाठी योग्य नाही. न्यायालय अन्विताच्या बाजूने निकाल देते, ज्यामुळे ती आपल्या वेदनादायी अध्यायातून मुक्त होते. तिची भावंडं भावनिक "इंडिपेंडन्स डे" साजरा करतात, जो उज्ज्वल भविष्याची हमी देतो. विराट सोबत असताना, अन्विता थोडा विराम घेण्याचा, स्वतःला पुन्हा शोधण्याचा आणि आपल्या कुकिंगच्या आवडीला पुढे नेण्याचा निर्णय घेते. शो लवकरच सहा महिन्यांचा लीप घेईल, ज्यात अन्विताचा आत्मशोध आणि नवीन सुरुवातींचा प्रवास दाखवला जाईल. नव्या सुरुवातींच्या उंबरठ्यावर, हा टप्पा अन्विता आणि विराटच्या बहुप्रतीक्षित प्रेमकथेची सुरुवात ठरेल का, की नियतीकडे अजूनही त्यांच्या वाट्याला काही वळणं शिल्लक आहेत? इत्ती सी खुशी'मध्ये अन्विता ही भूमिका साकारत असलेली सुम्बुल तौकीर खान म्हणाली, "अन्विताचा या क्षणापर्यंतचा प्रवास अत्यंत भावनिक राहिला आहे कारण हा फक्त कोर्ट केस जिंकण्याचा विषय नाही, तर तिचं आयुष्य परत मिळवण्याचा आहे. इतक्या काळापासून ती फक्त आपल्या भावंडांसाठीच नाही तर स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी आणि सन्मानासाठीही लढत होती. कोर्टरूम सीक्वेन्सचं शूटिंग खूप तीव्र होतं कारण त्यात अन्विताचा वेदना, ताकद आणि आशा सगळं पकडलं गेलं आहे. मला या टप्प्यातली सर्वात आवडती गोष्ट म्हणजे, सगळं सहन केल्यानंतर ती अखेर स्वतःला थांबण्याची आणि संघर्षापलीकडे ती कोण आहे हे पुन्हा शोधण्याची संधी देते. हा विजय फक्त एका कठीण अध्यायाचा शेवट नाही तर एका नवीन अध्यायाची सुरुवात आहे, जिथे अन्विता पुन्हा स्वतःसाठी स्वप्न पाहायला लागते." सोनी सबवर पाहा इत्ती सी खुशी, दर सोमवार ते शनिवार रात्री 9 वाजता.

### देवी पार्वतीच्या अटळ भक्तीने जागृत झाले भगवान महादेव



मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सब घेऊन आला आहे भक्ती, कुटुंब आणि दिव्य ज्ञानाच्या अमर कथा गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय मधून. शिव परिवाराच्या गाढ बंधनाचा उत्सव साजरा करत, शो सुंदरपणे भगवान गणेश (निर्णय समाधिया) आणि भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या कमी परिचित कथांना उलगडतो. भगवान शिव (अविनेश रेखी) आणि देवी पार्वती (श्रेनु पारिख) यांचे प्रिय पुत्र असलेल्या या देवतांच्या दिव्य प्रवास आजही पिढ्यांना प्रेरणा देतात. शोमध्ये आध्यात्मिक गहराई आणि कुटुंबातील भावनिक क्षणांचा सुंदर संगम दाखवला आहे, जो नातेसंबंध आणि मूल्यांना अधोरेखित करतो. आगामी भागांमध्ये कथा देवी पार्वती आणि भगवान शिव यांच्या दिव्य मिलनाकडे सरकते. सतीच्या बलिदानानंतर पुनर्जन्म घेऊन पार्वती महादेवाला जागृत करण्याच्या निर्धाराने तपस्या सुरू करते. महादेव गहन ध्यान आणि शोकात लीन असतात, पण पार्वती वर्षानुवर्षे कठोर तप आणि सेवा करते. दरम्यान, राक्षस तारकासुर (आमिर दलवी) चा अत्याचार ब्रह्मांडाला संकटात टाकतो. कामदेव (करण चौधरी) प्रेमबाणाने शिवाचे ध्यान भंग करण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे शिव प्रचंड क्रोधाने कामदेवाला भस्म करतात. तरीही पार्वतीची अटळ भक्ती हळूहळू शिवाचे दुःख वितळवते आणि त्यांच्या नियतीने ठरलेल्या मिलनाचा मार्ग तयार करते—एक असा क्षण जो ब्रह्मांडीय संतुलन पुनःस्थापित करतो आणि तारकासुराचा अंत करणाऱ्या पुत्राच्या जन्माची वाट मोकळी करतो. गणेश कार्तिकेय'मध्ये देवी पार्वतीची भूमिका साकारणाऱ्या श्रेनु पारिख यांनी सांगितले, "या टप्प्यात देवी पार्वतीचे पात्र साकारणे माझ्यासाठी खूप खास होते कारण ते तिच्या भक्तीची आणि शक्तीची गहराई दाखवते. देवी पार्वती म्हणून पुनर्जन्म घेतल्यानंतर, ती देवी सतीच्या बलिदानाची आणि भगवान शिवाने अनुभवलेल्या दुःखाची स्मृती सोबत घेऊन येते. हीच स्मृती तिला महादेवाला पुन्हा जगात आणण्यासाठी दृढ संकल्प देते. ज्या दृश्यांमध्ये ती वर्षानुवर्षे तपस्या करते आणि भगवान शिवावरील आपल्या प्रेमावर विश्वास ठेवते, ते शूट करणे अत्यंत भावनिक होते. मला देवी पार्वतीबद्दल सर्वात प्रेरणादायी गोष्ट तिचा धीर आणि अटळ श्रद्धा वाटते—भगवान शिव प्रतिसाद देत नसतानाही ती हार मानत नाही. हा ट्रॅक सुंदरपणे दाखवतो की भक्ती, चिकाटी आणि शुद्ध प्रेमात सर्वात खोल दुःख बदलण्याची ताकद असते." सोनी सबवर पाहा गणेश कार्तिकेय, दर सोमवार ते शनिवार रात्री 8 वाजता.

# चिंबळीतील काळभैरवनाथ यात्रेत ११ लाखांच्या लिलावाला दुप्पट बोली

## माऊली कड पहिले मानकरी; ५१ लिलावांत १.५३ कोटींची उलाढाल

**आळंदी (दै. संध्या) :**



चिंबळी (ता. खेड) येथील ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ महाराज यात्रेत जमा होणाऱ्या रकमेतून खर्च वजा जाता शिल्लक रकमेचा दरवर्षी यात्रा कमिटीच्या वतीने लिलाव करण्यात येतो. या लिलावाला लाखोंच्या बोली लागतात यंदा ९० लाख ५० हजाराला तब्बल ६२ लाख ६२ हजारांची एकूण बोली लागली. नाथाच्या तिजोरीत पुढील वर्षी मुद्दलसह १ कोटी ५३ लाख १२ हजार रुपये जमा होणार आहेत. अशी माहिती श्री.काळभैरवनाथ महाराज ग्राम उत्कर्ष संस्था अध्यक्ष हिरामण जैद,खजिनदार विश्वास बर्गे,सचिव बाळासाहेब ह.जाधव यांनी दिली आहे.

यात पहिल्या ११ लाख रुपयांच्या लिलावाचे मानकरी चिंबळी सोसायटीचे माजी अध्यक्ष माऊली उर्फ ज्ञानेश्वर कड ठरले असून त्यांनी ११ लाखाला ११ लाखांची बोली लावत प्रथम मान पटकाविला आहे.नाथांच्या तिजोरीत त्यांना एकूण २२ लाख जमा करावे लागणार आहेत.उद्योजक रोहिदास बर्गे यांनी ९ लाखाला ७ लाखाची बोली लावत द्वितीय मान मिळविला असून त्यांना १६ लाख जमा करावे लागणार आहेत.माजी उपसरपंच शिवाजी कड यांनी ७ लाखाला ४ लाखांची बोली लावत तृतीय मान मिळविला असून त्यांना ११ लाख जमा करावे लागणार आहेत.

उद्योजक अक्षय बटवाल यांनी ६ लाखाला दुप्पट ३ लाख ३६ हजार बोली लावत मान मिळविला असून ९ लाख ३६ हजार रुपये जमा करावे लागणार आहेत.त्यानंतर पार पडलेल्या ५ लाखांच्या प्रत्येकी ३ लिलावाचे माजी सभापती विलास कातोरे यांनी ३ लाख ५ हजार रुपये,उद्योजक अमोल जैद यांनी ३ लाख ७ हजार रुपये,रोहिदास बर्गे यांनी ३ लाख रुपये बोली लावत मानकरी ठरले.३ लाखांच्या प्रत्येकी ३ लिलावाचे उद्योजक शुभम बटवाल,उद्योजक लक्ष्मण कातोरे,माजी अध्यक्ष सत्यवान जैद सर्वाधिक बोली लावत मानकरी ठरले.२ लाखांच्या प्रत्येकी ४ लिलावाचे उद्योजक संदीप अवघडे,उद्योजक दीपक पाटोळे,उद्योजक चांगदेव कड,सागर बटवाल,माजी उपसरपंच शिवाजी कड सर्वाधिक बोली लावत मानकरी ठरले.तसेच दीड लाखाचे दोन व १ लाखाचे ७ लिलाव व ५० हजारांच्या प्रत्येकी २७ लिलावांना ग्रामस्थांकडून मोठ्या बोली लावण्यात आल्या.

यावेळी बाजार समितीचे माजी संचालक पांडुरंग बनकर,माजी सरपंच अर्जुन अवघडे,उपसरपंच राहुल चव्हाण,माजी उपसरपंच हेमंत जैद,यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष शंकर पा. जैद,सोसायटीचे अध्यक्ष पंडित कड,हभप.साखरचंद महाराज लोखंडे,अमोल बहिरट,संभाजी अवघडे,युवराज लोखंडे,बाळासाहेब तु.जाधव,सुनील बटवाल,नवनाथ बटवाल,तेजस बटवाल,समीर कड,दिलीप सातव,संजय जाधव,प्रशांत पिरंगुटे व इतर मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## सोनी सबच्या 'पुष्पा इम्पॉसिबल'मध्ये गोंधळ निर्माण करते

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका पुष्पा (करुणा पांडे) हिची प्रेरणादायी कहाणी सांगते. पुष्पा ही एक मजबूत आणि स्वतःच्या मेहनतीने उभी राहिलेली स्त्री आहे, जी आयुष्यातील कठीण प्रसंगांवर मात करत पुढे जाते. गृहिणीपासून वकील होण्यापर्यंतचा प्रवास करताना, वैयक्तिक दुःखांचा सामना करूनही पुष्पा खंबीरपणे उभी राहते. न्याय मिळवण्यासाठी ती नेहमीच ठाम राहते आणि आपल्या मूल्यांना धरून ठेवते, जरी मार्ग सोपा नसला तरी. आगामी भागांमध्ये, पुष्पाने लादलेल्या 'घर जेल'मधून सुटण्यासाठी आतुर झालेली शनाया (मुस्कान बामने) प्रत्येक संधीवर गोंधळ घालते — रात्री मोठ्या आवाजात संगीत वाजवण्यापासून ते शेजाऱ्यांना पुष्पाच्या विरोधात उभे करण्यापर्यंत. परिस्थिती गंभीर होते जेव्हा ती स्वतःला इजा करून पुष्पाला फसवण्याचा आणि तिच्या कस्टडीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करते. कथेतला महत्त्वाचा ट्विस्ट तेव्हा येतो जेव्हा राशी (अक्षया हिंदालकर) ऑडिशनसाठी कंटेंट रेकॉर्ड करताना नकळत शनायाची कृती कॅमेऱ्यात कैद करते. आरोप उभे राहतात तेव्हा पुष्पा ती रेकॉर्डिंग शनायाच्या वडिलांना दाखवते आणि सत्य समोर आणून स्वतःची निर्दोषता सिद्ध करते. पुढे, पाटरनमध्ये गोंधळ उडतो जेव्हा कंचन विहिरीत पडते आणि सगळे तिला वाचवण्यासाठी धावतात — पण शनायाला कळते की कंचन ही प्रत्यक्षात एक बकरी आहे. लोक एका प्राण्यासाठी इतका जीव धोक्यात घालत आहेत हे पाहून शनायाला न्यायालयात पुष्पाने सांगितलेले करुणेबद्दलचे शब्द आठवतात. पुष्पा तिला प्रेमाने आठवण करून देते की प्रत्येक सजीवाला काळजी मिळायला हवी, जशी सगळे मिळून कंचनला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# युवोन्मेश मैफिलीने रसिकांना मंत्रमुग्ध केले

## युवा कलाकारांच्या सादरीकरणाने रंगले पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचे दुसरे सत्र

**पुणे (दै. संध्या) :**




विविध रागांनी नटलेले शास्त्रीय गायन, मन तल्लीन करणारी पखवाज वादनाची जुगलबंदी आणि रसिकांच्या टाळ्या-वाहव्यांच्या गजरात पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवातील 'युवोन्मेश' ही खास युवा कलाकारांची मैफिल रंगली. तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राची सुरुवात गायिका डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी राग गुजरी तोडीमध्ये विलंबित ख्याल आणि द्रुत बंदिश सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाला गीत इनामदार, उमेश पुरोहित (तबला) आणि सुकन्या जोशी (तानपुरा) यांनी समर्पक साथ दिली. यावेळी बोलताना डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे म्हणाल्या, "या प्रतिष्ठित महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य असून, हे पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे आशीर्वादच आहेत."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश रामदासी यांनी केले, तर रश्मी अभिषेकी यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, "अभिजात संगीताचा प्रचार-प्रसार करण्यासाठी पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी मोठे योगदान दिले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय संगीत तरुणांपर्यंत पोहोचावे, यासाठी 'युवोन्मेश' हा विशेष विभाग सुरू करण्यात आला आहे." या प्रसंगी देवश्री कचरे आणि मंगल गवळी यांच्या हस्ते डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांचा सत्कार करण्यात आला. दुसऱ्या सत्रात पखवाज वादक पार्थ भूमकर आणि प्रथमेश तारळकर यांनी दमदार पखवाज वादन सादर केले. त्यांच्या प्रत्येक थापेसह मैफिल रंगत गेली आणि सभागृहात भक्तीमय वातावरणाची अनुभूती निर्माण झाली. अथर्व कुलकर्णी (संवादिनी) यांनी त्यांना साथ दिली. महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात आसामच्या गायिका श्रुती बुजरबारूआ यांनी अप्रतिम गायन सादर केले. त्यांनी राग शुद्ध सारंगमध्ये 'धरणी धरोहर' ही रूपक मध्य तालातील बंदिश सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणाला पार्थ ताराबादकर (तबला) आणि सौमित्र क्षीरसागर (संवादिनी) यांनी समर्थ साथ दिली.

यावेळी भावना व्यक्त करत श्रुती बुजरबारूआ म्हणाल्या, "या महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. आसामहून महाराष्ट्रात आल्यानंतर मी पंडित विजय कोपरकर यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुण्यात सादरीकरण करणे म्हणजे माझ्यासाठी माहेरच्या ठिकाणी संगीत सेवा करण्यासारखे आहे." युवा कलाकारांच्या उत्स्फूर्त आणि दर्जेदार सादरीकरणामुळे 'युवोन्मेश' मैफिलीने महोत्सवात विशेष रंग भरला.

## "साऊथ मुंबई ते चाळ": मुस्कान बामने सांगतात शनायाची धाडसी सफर, सोनी सबच्या पुष्पा इम्पॉसिबलमध्ये



**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सोनी सबवरील लोकप्रिय शो पुष्पा इम्पॉसिबल आपल्या हृदयस्पर्शी कथाकथनाने आणि प्रेक्षकांना जवळच्या वाटणाऱ्या व्यक्तिरेखांनी सतत प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. कथेतला ताजा ट्विस्ट म्हणजे शनायाची (मुस्कान बामने साकारलेली भूमिका) एन्ट्री. साऊथ मुंबईतून आलेली ही आत्मविश्वासी, बेधडक तरुणी, तिच्या विशेषाधिकारांनी भरलेल्या दृष्टिकोनासह जेव्हा पुष्पाच्या चाळजीवनाशी भिडते, तेव्हा नवीन समीकरणं आणि रोचक क्षण निर्माण होतात. तिच्या आगमनामुळे पुष्पा (करुणा पांडे) चा प्रवास आणखी गहिरा होतो.

एका खास संवादात मुस्कान बामने यांनी त्यांच्या व्यक्तिरेखा शनाया, सध्याच्या ट्रॅकबद्दल आणि प्रेक्षकांना या नवीन समीकरणातून काय अपेक्षित आहे याबद्दल खुलून सांगितले. तुम्हाला शनायाची भूमिका ऑफर झाली तेव्हा तुमची पहिली प्रतिक्रिया काय होती? "मला शनायाची भूमिका ऑफर झाली तेव्हा मी खरोखर खूप उत्साहित झाले. ती लगेचच वेगळी वाटली कारण पुष्पा इम्पॉसिबल मध्ये आपण जी दुनिया पाहतो त्यापेक्षा शनाया पूर्णपणे वेगळी आहे. शनाया ठाम विचारांची, बेधडक आणि आरामदायी जीवनशैलीची सवय असलेली आहे. साऊथ मुंबईतून आलेली एखादी मुलगी अचानक चाळीच्या वातावरणात स्वतःला जुळवून घेते ही कल्पना मला खूप रोचक वाटली. एक अभिनेत्री म्हणून, अशी व्यक्तिरेखा साकारणं रोमांचक आहे जी कथेतल्या ठरलेल्या लयीत बदल घडवते आणि तिच्या धाडसी बाह्यरूपामागे भावनिक स्तरही घेऊन येते."

इतक्या निष्ठावान प्रेक्षक असलेल्या शोमध्ये सामील होण्यात तुम्हाला सर्वात जास्त उत्साह कशामुळे आला? "अशा शोचा भाग होणं ज्याला आधीच समर्पित प्रेक्षकवर्ग आहे, ही खास गोष्ट आहे. पुष्पा इम्पॉसिबल ने अशी दुनिया तयार केली आहे ज्याशी लोक खरोखर जोडले गेले आहेत. शनाया या आवडत्या स्पेसमध्ये पूर्णपणे वेगळ्या दृष्टिकोनासह येते आणि जीवनशैलीतील हा संघर्ष कथेला नवीन आयाम देतो. जे प्रेक्षक आधीच या शोमध्ये गुंतले आहेत, त्यांना आता पाहायला मिळेल की नवीन व्यक्तिरेखा कशी सगळं हलवून टाकते." सध्या कथेत शनायाला रोचक व्यक्तिरेखा बनवणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत? "शनाया शोमध्ये अनिश्चितता घेऊन येते. ती अभिव्यक्तिपूर्ण आहे, आत्मविश्वासी आहे आणि कोणताही फिल्टर न लावता बोलते. विशेषाधिकारांनी भरलेल्या पार्श्वभूमीतून आल्यामुळे ती परिस्थिती वेगळ्या नजरेने पाहते, ज्यामुळे मजेदार आणि नाट्यमय दोन्ही क्षण तयार होतात. चाळमधल्या रहिवाशांसोबत विशेषतः पुष्पासोबत तिच्या संवादामुळे हे विरोधाभास अधिक ठळक होतात. नजरेतला हा संघर्षच तिची उपस्थिती इतकी आकर्षक बनवतो." शनायाची भूमिका साकारण्यासाठी तुम्ही कशी तयारी केली? "मी सर्वप्रथम शनायाची मानसिकता आणि ती ज्या दुनियेतून आली आहे ती समजून घेण्यावर लक्ष केंद्रित केलं. तिची बॉडी लँग्वेज, आत्मविश्वास आणि प्रतिक्रिया अशा असायला हव्या होत्या की जणू ती आराम आणि अधिकाराची सवय असलेली आहे. खोलीत प्रवेश करण्याचा तिचा अंदाज किंवा गोष्टी तिच्या मनासारख्या न झाल्या तर तिची प्रतिक्रिया यामध्ये ती तरुण, थोडी अधिकार दाखवणारी ऊर्जा दिसायला हवी होती. त्याच वेळी, मला हेही महत्त्वाचं वाटलं की ती व्यक्तिरेखा खरी वाटावी, ओव्हरड्रामेटिक नाही. त्यामुळे तो बॅलन्स साधणं माझ्यासाठी खूप महत्त्वाचं होतं."

महाज्योती — ज्ञानदीप समतेचा —

**कौशल्य, स्पर्धा आणि संशोधनाची त्रिसूत्री**

# 'महाज्योती'मुळे बहुजन विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला बळ

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून शासकीय सेवेत प्रवेश आणि कौशल्याधारित प्रशिक्षणातून आत्मनिर्भरतेचा मार्ग या दुहेरी शक्तीच्या आधारावर बहुजन समाजातील तरुणांचे भविष्य घडविण्याचे मोलाचे कार्य नागपूरची महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) गेल्या सहा वर्षांपासून प्रभावीपणे करीत आहे. शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि कौशल्य विकास यांचा समन्वय साधत 'महाज्योती'ने हजारो युवक-युवतींना केवळ नोकरीच नव्हे, तर सक्षम करिअरची दिशा दिली आहे.

'महाज्योती'ने कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीचा मजबूत पाया उभा केला आहे. माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, वस्त्रोद्योग, वित्त, वाहतूक आणि हस्तकला अशा ६० हून अधिक क्षेत्रांत प्रशिक्षण देत १८ हजार ७७८ विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून दिला आहे, तर २१ हजार ६६० युवकांनी स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारला आहे. शासनाच्या नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे युवक आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करत आहेत. संस्थेच्या कार्यपद्धतीत गुणवत्ता आणि पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. 'महाज्योती' ही संस्था सेक्टर स्किल कौन्सिल, इंडो जर्मन टूलरूम आणि सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग यांच्यामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करते. केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने कौशल्य विकासासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद आणि विविध क्षेत्रांसाठी ३६ सेक्टर स्किल कौन्सिलची स्थापना केली आहे. ही यंत्रणा सार्वजनिक-खाजगी भागीदारीवर आधारित आहे. यामध्ये केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय, एमएसएमई, कामगार आणि रोजगार मंत्रालयासोबत क्रेडाई, नॅसकॉम, सीआयआय, फिक्की, असोचॅम अग्रगण्य संस्थांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या स्किल इंडिया अंतर्गत तयार करण्यात आलेल्या स्किल इको सिस्टीमच्या लाभ राज्यातील युवकांना व्हावा यासाठी 'महाज्योती' प्रयत्न करत आहे. केंद्र शासनाच्या या सेक्टर स्किल कॉन्सिल मार्फत राज्य शासनातील कौशल्य विकास विभाग, लिडकॉम, शबरी आदिवासी महामंडळ विविध राज्यातील समग्र शिक्षा अभियान त्यांचे कौशल्य विकास कार्यक्रम राबवितात. केंद्र शासनाच्या पीएम विश्वकर्मा, पीएम कौशल्य विकास योजना, पीएम कौशल्य केंद्र, स्वदेश, स्पेसिफाइड स्किल्ड वर्कर या योजना 'एनएसडीसी'च्या स्किल इकोसिस्टिम द्वारे राबविल्या जातात. सेक्टर स्किल कॉन्सिल मार्फत अभ्यासक्रम निर्मिती, प्रशिक्षण आणि मुल्यमापण या प्रक्रिया त्या क्षेत्रातील कुशल संस्थाकडून राबविल्या जातात.

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'महाज्योती' ही केवळ प्रशिक्षण देणारी संस्था न राहता संधींचे सर्वसमावेशक केंद्र बनलेली आहे. स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात संस्थेने भक्कम कामगिरी केली असून, संघ लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, बँकिंग, कर्मचारी निवड आयोग तसेच विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांसाठी दिल्या जाणाऱ्या दर्जेदार प्रशिक्षणामुळे २०२१ ते २०२६ या कालावधीत तब्बल २ हजार ३५० हून अधिक विद्यार्थी शासकीय सेवेत दाखल झाले आहे. विशेष म्हणजे, २०२५ मध्ये ३२ विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करीत प्रशासनात ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम करण्यासाठी 'महाज्योती'ने केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर सर्वंकष आधारव्यवस्था उभी केली आहे. मोफत प्रशिक्षण, विद्यावेतन, आकास्मिक निधी, डिजिटल साधने, इंटरनेट सुविधा आणि दर्जेदार अभ्यास साहित्यामुळे विद्यार्थ्यांसाठीही यशाची दारे खुली झाली आहेत. संशोधन क्षेत्रातही 'महाज्योती'ने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पीएच. डी. शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत २ हजार ७७९ विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्यात आले असून, ६०३ संशोधकांनी आपले संशोधन पूर्ण केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन सादर करणारे विद्यार्थिनी या प्रवाहातून पुढे येत असून,ज्ञाननिर्मितीत बहुजन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत आहे. ग्रामीण आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी 'महाज्योती'ने राबविलेला वैमानिक प्रशिक्षण उपक्रम विशेष ठरला आहे. राज्यातील १६ विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. अत्यंत खर्चिक असलेले हे प्रशिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देत संस्थेने सामाजिक समतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थी लवकरच व्यावसायिक वैमानिक म्हणून कार्यरत होण्याच्या मार्गावर आहेत. हा उपक्रम 'महाज्योती'च्या दूरदृष्टीचा आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिलेल्या बळाचा प्रेरणादायी नमुना ठरतो. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणक्रांतीच्या विचारांना आधुनिक स्वरूप देत 'महाज्योती' आज बहुजन विद्यार्थ्यांसाठी परिवर्तनाची सशक्त प्रेरणा बनलेली आहे. स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि संशोधन या तिन्ही आघाड्यांवर भक्कम पायाभरणी करत ही संस्था समाजाला नव्या उंचीवर नेणारी प्रभावी दिशा ठरत आहे. बहुजन विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देत आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत 'महाज्योती'ची भूमिका अधिकाधिक महत्त्वाची ठरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### रस्ते व स्कायवॉक मार्गांना गती; आ. सुनील शेळके यांचा PMRDAकडे ठोस पाठपुरावा

मावळ (दैनिक संध्या) : मावळ मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) नवनियुक्त आयुक्त अभिजीत चौधरी यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत लोणावळा शहरातील मुख्य रस्ता, स्कायवॉककडे जाणारा रस्ता तसेच देहूफाटा ते येलवाडी या मार्गांवरील रखडलेल्या कामांबाबत अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले. ही कामे तातडीने पूर्ण करण्याची आग्रही मागणी आमदार शेळके यांनी केली. याशिवाय मावळ तालुक्यातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी अद्याप कन्सल्टंट नेमणूक न झाल्याने कामे रखडली असल्याची बाबही आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच 'इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्पा'अंतर्गत असलेली कामे टेंडर प्रक्रियेत अडकून पडल्याने त्यालाही विलंब होत असल्याचे बैठकीत समोर आले. या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत आयुक्त अभिजीत चौधरी यांनी कामांची गुणवत्ता राखत त्यांना गती देण्याचे आश्वासन दिले. मावळच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार सुनील शेळके यांचा प्रशासकीय पाठपुरावा सातत्याने सुरू असून, प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ते अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात असल्याचे पुन्हा एकदा या बैठकीतून स्पष्ट झाले. तालुक्यातील विकासकामांना चालना देण्यासाठी घेतलेली ही बैठक मावळच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात असून, आमदार शेळके यांच्या नेतृत्वाखाली विकासाची गती अधिक वाढणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



### संत तुकाराम नगरमध्ये टपरी माफियांचा सुळसुळाट, कारवाई करण्याची मागणी

■ अन्यथा संत तुकाराम नगरचे 'टपरीनगर' नामकरण करा; नगरसेवक जितेंद्र ननावरे यांचा आयुक्तांना इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर परिसरात टपरीधारक व टपरी माफियांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याचा गंभीर आरोप करत राष्ट्रवादीचे नगरसेवक जितेंद्र ननावरे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. परिस्थिती नियंत्रणात न आल्यास या परिसराचे नाव 'टपरीनगर' करण्याची वेळ येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. जितेंद्र ननावरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संत तुकारामनगर, मेट्रो स्टेशन परिसर, वल्लभनगर एसटी स्थानक, वाय.सी.एम. रुग्णालय, डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय तसेच मंडई परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत. टपरी माफियांनी पदपथांवर अतिक्रमण करून त्या जागा पथारीवाले व फेरीवाल्यांना भाड्याने देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या टपऱ्यांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, नागरिकांना चालण्यासाठीही जागा उरलेली नाही. विशेष म्हणजे, रुग्णालयांच्या परिसरात अतिक्रमण झाल्याने रुग्णवाहिका वेळेवर पोहोचण्यात अडथळे निर्माण होत असल्याची बाबही समोर आली आहे. तसेच, टपरीधारकांकडून कचरा व सांडपाणी रस्त्यावर टाकले जात असल्याने परिसरात अस्वच्छता वाढली आहे. नागरिकांनी तक्रार केल्यास त्यांना दमदाटी व दबावाला सामोरे जावे लागत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. प्रशासन कारवाईसाठी गेले असता काही टपरीधारकांकडून राजकीय दबाव आणला जात असल्याचेही ननावरे यांनी नमूद केले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, अनधिकृत टपऱ्यांवर तातडीने कारवाई करून अतिक्रमण हटवावे, वाहतूक सुरळीत करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जितेंद्र ननावरे यांनी केली आहे. अन्यथा, संत तुकारामनगरचे 'टपरीनगर' असे नामकरण करण्याची कार्यवाही करावी, अशी उपरोधिक मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

### भोसरी येथील संघर्ष प्रतिष्ठाणच्या अध्यक्षपदी सिद्धांत डोळस यांची निवड

भोसरी (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव 2026 निमित्त संघर्ष प्रतिष्ठाणच्या अध्यक्षपदी आयु. सिद्धांत बाळू डोळस यांची निवड करण्यात आली आहे. भोसरी येथे आयोजित बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. या बैठकीस संघर्ष प्रतिष्ठाणचे माजी अध्यक्ष मनोज डोळस यांच्यासह विजय ढमढेरे, प्रतिक डोळस, राहुल शिंदे, मिथिलेश कांबळे, राज सोनवणे, तनिष झेंडे, निखिल ओव्हाळ, अक्षय शिंदे, रोहित डोळस, रोहित माने, अविनाश ओव्हाळ, प्रितम डोळस, अविनाश चव्हाण, निथिलेश डोळस, ऋषिकेश ओव्हाळ, रुपेश आपटे आदींसह सर्व सभासद उपस्थित होते. नवीन अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर सिद्धांत डोळस यांनी आभार व्यक्त करत यंदाचा जयंती महोत्सव अधिक उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच सामाजिक एकोपा आणि युवकांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी मांडला.

### पिंपरी-चिंचवडमध्ये पीएम आवास योजनेचा टप्पा दोन; हजारो कुटुंबांना घर मिळणार

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये रावेत, मामुर्डी, पुनावळे, वडमुखवाडी, ताथवडे आणि चोविसावाडी या सहा ठिकाणी गृहप्रकल्प राबविण्यात येणार आहे. किवळे आणि डुडुळगाव येथे प्रकल्पाचे काम सुरू आहे. हे आठ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील आठ हजार 745 कुटुंबांना हक्काचे घर मिळणार आहे. न्यायालयात वाद गेल्याने तसेच, मुदतीमध्ये जागा ताब्यात न आल्याने रावेत येथील 934 सदनिकांचा गृहप्रकल्प रद्द करण्यात आला. तेथील लाभार्थ्यांना किवळे येथील खासगी गृहप्रकल्पात सदनिका देण्यात आल्या. प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की ओढवलेल्या रावेत येथील गृहप्रकल्पाच पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

# पाण्याअभावी रस्त्याकडेची अनेक झाडे जळाली

**उद्यान विभागावर नागरिकांचा संताप**

पिंपळे गुरव (दै. संध्या) : शहरात तापमान वाढत असताना पिंपळे गुरव परिसरातील रामनगर ते सीएमई सैन्य दलाच्या सीमेलगत जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात झाडे जळाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ब्लू डार्ट ते मयुर नगरी चौक दरम्यानच्या फूटपाथवर ५ ते १५ फूट उंचीपर्यंत वाढ झालेली सुमारे २५ झाडे पाण्याअभावी कोमेजून जळून गेल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. महापालिकेकडून शहरात ३२ लाख झाडे असल्याचा दावा केला जात असताना प्रत्यक्षात वाढलेली झाडेच जगवता येत नसल्याची वस्तुस्थिती समोर येत आहे. यामुळे "झाडे लावा, झाडे जगवा" हा शासनाचा संदेश केवळ घोषणांपुरताच मर्यादित राहिला आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. फूटपाथ विकसित करताना झाडांच्या बुंध्याभोवती सिमेंटचे आवरण दिल्याने मुळांना वाढण्यासाठी जागा मिळत नाही, तसेच पाणी व मातीची कमतरता निर्माण होते. परिणामी झाडे कोमेजून जळण्याच्या घटना वाढत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. मानवी हक्क संरक्षण जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी प्रशासनावर टीका करत, "आजचे वृक्षारोपण व संरक्षण म्हणजे उद्याच्या पिढीसाठी ऑक्सिजनची हमी आहे; मात्र प्रत्यक्षात झाडांची अशी अवस्था होत असेल तर हे दुर्दैवी आहे," असे म्हटले. त्यांनी उद्यान विभागाने तातडीने लक्ष देऊन झाडे वाचवावीत, अशी मागणी केली.



दरम्यान, महाराष्ट्र शासनाचे वृक्षमित्र अरुण पवार यांनी झाडांना टँकरद्वारे पाणी देण्याचे आश्वासन दिले असून गरज पडल्यास तत्काळ मदत उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली आहे. पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड यांनीही कामचुकार अधिकारी व ठेकेदारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, "अधिकारी फक्त आश्वासन देतात, प्रत्यक्षात कारवाई होत नाही," अशी टीका केली.

या निवेदनावर अण्णा जोगदंड, संजना करंजावणे, काळुराम लांडगे, संगीता जोगदंड, गजानन गजानन, मुरलीधर दळवी यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. तसेच सामाजिक कार्यकर्ते अरविंद मांगले, जालिंदर दाते, संजय कांबळे, गणेश वाडेकर, पंडित वनस्कर, रितेश वनस्कर, महेश राऊत आदी उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केला ज्येष्ठांचा वाढदिवस साजरा

**पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी अनोखा उपक्रम**



पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या "ज्येष्ठानुबंध" उपक्रमांतर्गत आता त्यांच्या वाढदिवसाचे विशेष सेलिब्रेशन करून अनोख्या पद्धतीने सन्मान केला जात आहे. या उपक्रमाला शहरातील नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या संकल्पनेतून "ज्येष्ठानुबंध" हा ॲप विकसित करण्यात आला आहे. या ॲपच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना पोलिस सेवा तसेच इतर आवश्यक मदत सहज उपलब्ध करून दिली जाते. आतापर्यंत शहरातील २८ हजारांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी या ॲपवर नोंदणी केली आहे. या उपक्रमांतर्गत पोलिस अधिकारी आणि कर्मचारी दररोज काही ज्येष्ठ नागरिकांच्या घरी भेट देऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतात. याचबरोबर त्यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला जातो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होत आहे. अलीकडेच पोलिस आयुक्तालय हद्दीतील काही ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन साजरे केले.

या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक श्रीमती सुशीला कपालदास गुलार्णी, वय ६१ वर्षे, रा. नवताजधाम वृध्दाश्रम, अंबी, ता. मावळ, श्रीमती पद्मा किशोर सरपोद्दार, ७७ वर्षे, रा. कुलदीप रेसीडन्सी, फ्लॅट नं.०१, सेक्टर नं.१, वैष्णोमाता मंदिराजवळ, इंद्रायणीनगर, भोसरी, श्री. नयन रमाकांत पानसरे, वय ७४ वर्षे, रा. ब्ल्युरिज राजीव गाधी इन्फोटेक पार्क, फेज १, हिंजवडी यांची समक्ष भेट घेवुन पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचे वाढदिवस साजरे केले आहेत. यावेळी संबंधित जेष्ठ नागरिकांनी पोलिसांचे आभार मानत या उपक्रमाचे कौतुक केले.

"ज्येष्ठानुबंध" उपक्रमाला शहरातून उत्तम प्रतिसाद मिळत असून, अधिकाधिक ज्येष्ठ नागरिकांनी या ॲपचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी केले आहे.

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या आजी श्रीमती नानाबाई बारणे यांचे निधन



थेरगाव (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक गोविंद बारणे यांच्या आजी श्रीमती नानाबाई गोपाळ बारणे (वय ८७) यांचे गुरुवार, दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात बारणे परिवाराचा मोठा आप्तपरिवार आहे. श्रीमती नानाबाई बारणे या अत्यंत सुस्वभावी आणि प्रेमळ होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच थेरगाव परिसरात शोककळा पसरली असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बारणे परिवाराचे सांत्वन केले आहे. स्व. श्रीमती नानाबाई बारणे यांच्या पार्थिवावर गुरूवार दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता थेरगाव स्मशानभूमी, थेरगाव गावठाण येथे शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला.

## महापालिका दवाखान्यास "माता रमाई आंबेडकर" नाव द्यावे

**माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची मागणी**



पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर (गावठाण) येथील महापालिका दवाखान्यास "माता रमाई आंबेडकर" हे नाव देण्यात यावे, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर दवाखाना हा स्थानिक नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आरोग्यसेवेचा केंद्रबिंदू असून, त्याला प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे नाव देणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. माता रमाई आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साथ देत समाजकारणात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या त्याग, संयम आणि समाजाप्रती असलेल्या निष्ठेमुळे त्या आजही प्रेरणास्थान मानल्या जातात. या दवाखान्यास त्यांचे नाव दिल्यास त्यांच्या कार्याचा सन्मान होईल. तसेच परिसरातील नागरिकांमध्ये सामाजिक जाणीव आणि प्रेरणा निर्माण होईल, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## गुन्हे शाखा युनिट ३ ची मोठी कारवाई

**चऱ्होली येथे २ लाखांचा विनापरवाना विदेशी दारूचा साठा जप्त**




पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-३ ने अवैध दारूविक्रीवर मोठी कारवाई करत चऱ्होली येथे सुमारे २ लाख ४८० रुपयांचा विदेशी दारू साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध धंद्यांना मोठा आळा बसला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, चऱ्होली येथील दाभाडे सरकार चौक परिसरात काही जण अवैधपणे विदेशी दारू साठवून विक्री करत असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत रामप्रसाद साहेबराव साळुंखे वय ३३ वर्ष रा.चऱ्होली (खु) ता. खेड जि. पुणे २) तिलक हेमंत पटेल वय २१ वर्ष रा. वापी नानी तंबाडी ता. पार्डी जि. वलसाड राज्य गुजरात ३) अनिल रामसुरत यादव यय २४ वर्ष रा. चनद कॉलनी वापी ता. पार्डी जि. वलसाड राज्य गुजरात यांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडून एकुण २० नग खाकी रंगाच्या बॉक्सची व दोन पाढऱ्या रंगाच्या गोणीची बॉटल पाहणी केली असता त्यामध्ये रॅायल चॅलेंज कंपणीचे ०६ बॉक्स, इम्पेरीयल ब्ल्यु कंपणीचे ०८ बॉक्स, व रॉयल स्टॅग कंपणीचे ०६ बॉक्स तसेच दोन पाढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये रॅायल चॅलेंज कंपणीच्या ४०० नग बॉटल व आरोपीचे तीन मोबाईल फोन अशी एकुण २ लाख ४८० रुपये किंमतीची विदेशी दारु व तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले असुन त्यांच्या विरुद्ध दिघी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी संतोष कसबे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ३ यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक सुनिल जावळे, पोलीस अंमलदार सोमनाथ बोहाडे, सागर सुर्यवंशी, श्रीधन इचके, शशिकात नांगरे, समिर काळे, राजकुमार इधारे व निखील फापाळे यांनी केली आहे.

# २० दिवसांत २७ हजार ८४० मिळकत कर थकबाकीदारांनी घेतला अभय योजनेचा लाभ




पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अभय योजना लागू केल्यापासून २० दिवसांमध्ये तब्बल २७ हजार ८४० मालमत्ता कर थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेचा लाभ घेत भरलेल्या मालमत्ता कराची रक्कम तब्बल ८० कोटींहून अधिक आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ (रात्री १२ पर्यंत) सुरू राहणार असून, अद्याप ज्या मालमत्ताधारकांचा मालमत्ता कर भरणे बाकी आहे, अशा थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी अभय योजना १ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आली. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांच्या मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरल्यास संबंधित मालमत्ताधारकांना विलंब शुल्कावर ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५-२०२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकरकमी भरणे आवश्यक असून, या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अभय योजना लागू झाल्यापासून १ मार्च २०२६ (सकाळी १० पासून) ते २० मार्च २०२६ (दुपारी १२ पर्यंत) या २० दिवसांच्या काळात तब्बल २७ हजार ८४० मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेत ८० कोटीहून अधिक रक्कम जमा झाली आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीदारांना १९ कोटी १५ लाखांची सवलत देण्यात आली आहे. आतापर्यंत ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ८३० कोटी ५ लाखांचा भरणा केला आहे.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुली मोहिमेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, मोठ्या प्रमाणावर कर संकलन झाले आहे. तसेच काही मालमत्ताधारकांकडून अद्याप थकीत रकमेचा भरणा झालेला नसून, अशा मालमत्ताधारकांनी महानगरपालिकेच्या 'अभय योजना'चा लाभ घेऊन ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत मालमत्ता कर भरून विलंब शुल्कावर ९० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

महानगरपालिकेने शनिवार, रविवारसह दि. २१ मार्च रोजी रमजान ईद, दि. २६ मार्च रोजी श्री राम नवमी आणि ३१ मार्च रोजी महावीर जयंती अशा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कर संकलन केंद्रे नागरिकांसाठी खुली ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नोकरदार वर्गास आणि सर्वसामान्य नागरिकांना या सुविधेमुळे सुट्टीच्या दिवशीही कर भरणे सुलभ होणार आहे. तसेच कामकाजाच्या दिवशी सर्व कर संकलन केंद्रे सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहतील.

> महानगरपालिकेच्या 'अभय योजने'ला नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. ही योजना नागरिकांना दिलासा देणारी असून, विलंब शुल्कावर ९० टक्के सवलतीमुळे थकबाकीदारांना मोठा आर्थिक फायदा होत आहे. मात्र अजूनही काही मालमत्ताधारकांकडून थकीत कराचा भरणा झालेला नाही. अशा सर्वांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत रक्कम एकरकमी भरून या योजनेचा लाभ घ्यावा. महापालिकेकडून ऑनलाइन सुविधा तसेच सर्व कर संकलन केंद्रे सुरू ठेवण्यात आली असून, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही ही केंद्रे खुली राहणार आहेत. नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता तातडीने कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा.
>
> **– डॉ. विजय सुर्यवंशी , आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> महानगरपालिकेच्या 'अभय योजना'ला नागरिकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा प्रशासनावर असलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. ही योजना नागरिकांना दिलासा देणारी असून, थकीत मालमत्ता करावरील विलंब शुल्कात मोठी सवलत देऊन आर्थिक दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्या नागरिकांकडे अद्याप थकीत मालमत्ता कर बाकी आहे, त्यांनी ३१ मार्चपूर्वी या योजनेचा लाभ घेऊन आपली आर्थिक बचत करावी.
>
> **– रवि लांडगे, महपौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्वामी समर्थांचा प्रगट दिन उत्साहात साजरा

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : काऱ्हाटी - ता. बारामती येथील स्वामी समर्थ महाराज मठामध्ये स्वामी समर्थांचा प्रगट दिन उत्साहात साजरा. यावेळी मंदिर परिसर विद्युत रोषणाईने लखलखित करण्यात आला. सकाळी नित्य पूजा, अभिषेक, होम हवन, भजन आदी कार्यक्रम झाले. दुपारी बारा वाजता महाराजांचा पाळणा घेऊन प्रकट दिन साजरा करण्यात आला. यावेळी शहाकाका, ढोले भाऊ, बि.डी भापकर, रामचंद्र जगताप, भाऊसाहेब राने श्री विठ्ठल प्रसादिक भजनी मंडळाचे सुरेश वाबळे,बाळासाहेब वाबळे , अरविंद वाबळे, ज्ञानदेव जाधव, सुरेखा जाधव, चंद्रकला वाबळे, मिरा परुळेकर आदींनी भजन सेवा केली. यावेळी मंदिरात हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

### कोरेगावमुळमध्ये हनुमान जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : श्रीराम जन्म व श्री हनुमान जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्री जगद्गुरु तुकोबाराय गाथा पारायण सोहळा प्रारंभ गुरुवार दि.२६ मार्च २०२६ ते समाप्ती गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ दरम्यान हा सप्ताह हनुमान मंदिर कोरेगावमुळ (ता.हवेली) याठिकाणी संपन्न होणार असल्याचे माहिती सप्ताह समितीच्या वतीने देण्यात आली. काकडा भजन, गाथा पारायण, गाथा भजन, हरिपाठ, प्रवचन, किर्तन, हरिजागर असा दिनक्रम असणार आहे. सदर कार्यक्रमाचे व्यासपीठ चालक ह.भ.प. मसलकर महाराज, ह.भ.प. संभाजी महाराज अपुणे, ह.भ.प. अविनाश महाराज लेकुळे पाहणार आहे. गुरुवार दि.२६ मार्च २०२६ रोजी ह.भ.प. बाबा महाराज गायकवाड यांच प्रवचन - किर्तन महंत गिरीराज शास्त्री महानुभाव यांचे होणार आहे. शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी ह.भ.प. नाना महाराज काळे यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. रेश्माताई महाराज काकडे यांचे होणार आहे. शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी ह.भ.प. अक्षय महाराज रोडे यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. ऋषीकेश महाराज नवले यांचे होणार आहे. रविवार दि.२९ मार्च २०२६ रोजी जेष्ठ समाजसेवक ह.भ.प. डॉ रवींद्र महाराज भोळे यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. राणीताई महाराज कोलते यांचे होणार आहे. सोमवार दि.३० मार्च २०२६ रोजी ह.भ.प. संभाजी महाराज आपुणे यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. कु.दिपालीताई महाराज घोडके यांचे होणार आहे. मंगळवार दि.३१ मार्च २०२६ रोजी ह.भ.प. सुनिताताई महाराज कुंजीर यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. बाळा महाराज आहेर यांचे होणार आहे. बुधवार दि.१ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. प्रमिला महाराज तळेकर यांच प्रवचन - किर्तन ह.भ.प. चंद्रकांत महाराज धायगुडे यांचे होणार आहे. गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ वा. दरम्यान काल्याचे किर्तन ह.भ.प. तुषार महाराज पाबळे यांचे संपन्न होणार आहे.

### गॅस टंचाईमुळे चुलीवर शिजते मटण

नारायणगाव (दैनिक संध्या) : सध्या चालू असलेल्या इराण, अमेरिका युद्धामुळे देशात इंधन टंचाई होत मोठ्या प्रमाणावर होत आहे.ग्रामीण भागात तर सिलिंडर बुकिंगसाठी 45 दिवसांची अट असल्याने गॅसवर अवलंबून असणारे उद्योग अडचणीत आले आहेत. सध्या शहर,ग्रामीण भागातील हॉटेल व्यावसायिकांना गॅस टंचाईच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणात हाल सोसावे लागत आहे. शहरी भागातील हॉटेल व्यावसायिकांना गॅस उपलब्ध होत नसल्यामुळे ते बंद ठेवण्यात आले आहेत. तर ग्रामीण भागातील हॉटेल व्यावसायिकांनी गॅसला पर्याय म्हणून चुली पेटवू लागल्या आहेत. या हॉटेलमध्ये सध्या चुलीवर मटन बनवले जात आहे. तसेच मिसळ,वडापाव बनवण्यासाठी लागणारे मटेरियल सुद्धा चुलीवर बनवले जात असून त्याची चव सुद्धा अप्रतिम असल्याचे ग्राहक सांगत आहेत. सध्या घरगुती गॅस सुद्धा वेळेवर मिळत नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. युद्ध पुढे किती दिवस चालणार आहे हे माहीत नसल्याने ग्रामीण भागात सध्या तरी शेणाच्या गोवऱ्या,लाकडांना चांगलाच भाव मिळत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. जोपर्यंत गॅस टंचाईचा गोंधळ मिटत नाही तोपर्यंत खवय्यांना चुलीवर तयार केलेल्या पदार्थांची अस्सल चव चाखायला मिळणार हे मात्र नक्की!

# नारायणगावमध्ये पवित्र रमजान ईद उत्साहात

**छत्रपतींच्या आदर्शाने नारायणगावात धर्मनिरपेक्षपणे काम करतोय – उपसरपंच बाबु पाटे**

**नारायणगाव येथे ईदगाह मैदान, सुन्नी जामा मस्जिद, शाही जामा मस्जिद येथे मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून एकमेकांची गळाभेट घेत रमजान ईद च्या शुभेच्छा दिल्या.**

नारायणगाव (दै. संध्या)



छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन आपण नारायणगावात सर्व उत्सवांमध्ये सर्वांना सोबत घेऊन धर्मनिरपेक्षपणे काम करतोय. उपवासामुळे शरीर आणि मन शुद्ध होत व्यक्तीमध्ये संयम आणि स्वनियंत्रण येते. आरोग्याच्या दृष्टीनेही उपवासाचे मोठे महत्व आहे. लहान मुलेही उपवास (रोजा) पकडतात हे कौतुकास्पद आहे. असे मनोगत नारायणगावचे उपसरपंच योगेश उर्फ बाबु पाटे यांनी व्यक्त केले.

पवित्र रमजान ईद निमित्त नारायणगाव ईदगाह मैदानावर जमलेल्या सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देताना बाबु पाटे बोलत होते.

यावेळी नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे म्हणाले की, रमजानच्या पवित्र महिन्यात उपवासामुळे व्यक्तीमध्ये शांतता, आत्मविश्वास आणि संयमीपणा येतो. त्यातून पुढे काम करण्याची उमेद आणि ऊर्जा मिळते असे सांगत मुस्लिम बांधवांना रमजान ईदनिमित्त सुख समृद्धीच्या शुभेच्छा दिल्या.


याप्रसंगी मुस्लिम जमातचे सदर एजाज आतार, माजी उपसरपंच आरिफ आतार, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, सोमशेखर शेटे, दत्ता ढेंबरे, विश्वस्त मेहबूब काझी, गफूर तांबोळी, रशीद इनामदार, जलील अन्सारी, हाजी नूर मोहमंद मनियार, युवा शक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष अशफाक पटेल, जुबेर शेख, तौसीफ कुरेशी, यासह नारायणगाव सुन्नी मुस्लिम जमातचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानिमित्ताने इदगाह मैदान येथे मौलाना मुफ्ती मुनाझीर हुसैन कादरी, सुन्नी जामा मस्जिद येथे हाफिज शेहबाज रजा यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. यावेळी त्यांनी मुस्लिम बांधवांना एकतेचा आणि एकात्मतेचा संदेश दिला.

या निमित्ताने नारायणगाव पोलीस स्टेशनच्या वतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, सोमशेखर शेटे, दत्ता ढेंबरे व नारायणगाव पोलिसांच्या वतीने मुस्लिम बांधवांना पाणी वाटप व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

## महिलांसाठी ‘आस्था ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी शिबीर’ संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)




जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डिसेंट फाउंडेशन पुणे आणि तालुका वकील संघ जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर न्यायालयात महिला वकील पोलीस कर्मचारी आणि पक्षकार महिलांसाठी आस्था ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात एकूण 57 महिलांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाने तपासणी करण्यात आली.

'वेळेत निदान हाच बचावाचा मार्ग' शिबिरादरम्यान मार्गदर्शन करताना डॉ. प्रिया करडीले यांनी महिलांना आरोग्याबाबत जागृत राहण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या ग्रामीण भागातील महिला अनेकदा लाज किंवा आर्थिक परिस्थितीमुळे आजार अंगावर काढतात.स्तनाचा कर्करोग जर पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात लक्षात आल्यास तर तो रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो.मात्र तिसऱ्या टप्प्यात हा आजार गेल्यास तो जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे वेळेत तपासणी करणे आवश्यक आहे.एचपीव्ही लसीकरणाचे महत्व तज्ञ मार्गदर्शक डॉ. शीतल शिंदे आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत माहिती दिली.कुटुंबातील 14 वर्षाच्या मुलींना एचपीव्ही लस टोचून घेणं हे भविष्यातील धोके टाळण्यासाठी तसे गरजेचे आहे. हे त्यांनी पटवून दिले. विशेष म्हणजे ही लस प्राथमिक आरोग्य केंद्रात विनामूल्य उपलब्ध आहे असे त्यांनी सांगितले.डिसेंट फाउंडेशनचे सामाजिक योगदान डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षात 4 हजार पेक्षा जास्त महिलांची ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी करण्यात आली असून 20 गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमासाठीजिल्हा सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार, वरिष्ठ न्यायाधीश अजमत हुसेन महमद हुसेन,न्यायाधीश श्रेया जैन मॅडम यांची उपस्थिती होती. तसेच तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे,ॲड. वर्षाताई डहाळे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई,डॉ. एफ. बी.आतार, डॉ. दयानंद गायकवाड,डॉ. प्रियांका बोरा,तपासणी तज्ञ सपना बेलवटे,उज्वला गवळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व महिलांना आरोग्यविषयक जनजागृतीपर कळी उमलताना या पुस्तकाचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शमीन इनामदार व तृप्ती देसाई यांनी केले तर आभार वकील संघाच्या उपाध्यक्षा ॲड. नीलिमा शेरकर यांनी मानले.

## दौंडमध्ये अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे नुकसान

यवत (दै. संध्या)

■ आमदार राहुल कुल यांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश

दौंड तालुक्यात १८ व १९ मार्च रोजी झालेल्या अचानक अवकाळी पाऊस आणि भीषण गारपिटीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार राहुल कुल यांनी महसूल आणि कृषी विभागाला तातडीने घटनास्थळी जाऊन नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. आजपासूनच प्रशासकीय यंत्रणा शेताच्या बांधावर उतरणार आहे. तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात पावसाचा आणि गारांचा जोर सर्वाधिक होता. यामध्ये प्रामुख्याने यवत, यवत स्टेशन, उंडवडी, खामगाव, खानोटे, पिलानवाडी, दहीटने आणि राहू या गावांचा समावेश आहे. या भागात कांदा, भाजीपाला, फळबागा आणि चारा पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याचे समोर आले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे या आपत्तीमुळे कंबरडे मोडले आहे. यावर भाष्य करताना आमदार राहुल कुल म्हणाले की, "बळीराजावर आलेले हे संकट मोठे आहे. मी संबंधित महसूल विभाग आणि कृषी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता असावी आणि तालुक्यातील एकही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

## राणुबाईमळा येथे सोमवारपासून आई राणुबाई मातेचा उत्सव

चाकण (दै. संध्या)



चाकण लगतच्या राणुबाई मळा येथे सोमवार (दि.२३) ते मंगळवार (दि.२४) या सलग दोन दिवसांच्या कालावधीत आई राणुबाई मातेचा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सोमवारी उत्सवाच्या दिवशी सकाळी आठ वाजता देवीचा अभिषेक, मांडव टहाळा व सायंकाळी सात वाजता देवीची महाआरती होणार आहे. त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात देवीचा पालखी सोहळा रंगणार आहे. करमणुकीसाठी रात्री नऊ वाजता शैलेश लोखंडे प्रस्तुत बारा गावच्या बारा अप्सरा हा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मंगळवारी संध्याकाळी ९ ते १२ या वेळात एक गाव बारा भानगडी हे नाटक स्थानिक कलाकार सादर करणार आहेत. समस्त ग्रामस्थ राणुबाईमळा व तरुण कार्यकर्त्यांनी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन केले आहे. उत्सवाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

## वाल्हे नगरीत रमजान ईद उत्साहात साजरी

वाल्हे (दै. संध्या)



हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रतिक असलेल्या वाल्हे ( ता.पुरंदर ) नगरीत ईद –उल-फित्र ची नमाज अदा करून येथील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी केली.

यावेळी वाल्हेसह मांडकी दौंडज पिंगोरी सुकलवाडीआदी ठिकाणच्या मुस्लीम समाज बांधवांनी सकाळच्या प्रहरी येथील शाही सुन्नी मशिदीत सामुहिक नमाज पठणासाठी गर्दी केली होती.या दरम्यान मौलाना मुनीर शेख यांनी ईद उल फित्र ची नमाज अदा करून कुरआनचे महत्व विशद करताना मोहम्मद पैगंबरांच्या शांती प्रिय शिकवणीची आठवण करून दिली.त्यानंतर मशिदीच्या प्रांगणात हिंदू बांधवांनी मुस्लीम बांधवांची गळाभेट घेतली व त्यांना ईदच्या शुभेच्छा देखील दिल्या. याप्रसंगी मुस्लीम समाजाचे सरवरखान पठाण शाही सुन्नी मस्जिद ट्रस्टचे असलम पठाण तसेच चांदभाई शेख सिकंदर इनामदार आयुब इनामदार समीर आतार अमर तांबोळी असलम नदाफ बाबाभाई इनामदार खुद्बुद्दिन तांबोळी पोलीस निरीक्षक हैदर पठाण यांसह महर्षी वाल्मिकी वारकरी सेवा संघाचे अशोक महाराज पवार तसेच प्रा. सचिन दुर्गाडे नाना दाते दादासाहेब मदने विठ्ठल पवार शंकर पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वाल्हे पोलीस चौकीचे सहायक पोलीस हवालदार भाऊसाहेब भोंगळे तसेच प्रल्हाद वाल्हेकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

मुळशीचे पाणी पूर्ववाहिनी खोऱ्यात वळवण्याबाबत

## जलसंपदा मंत्र्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

**आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नांना यश!**

दौंड (दै. संध्या)



यवत-मुळशी प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वेकडे वाहणारे पाणी जे वीज निर्मितीसाठी कृत्रिमरित्या पश्चिमेकडे वळविण्यात आले होते, ते पुन्हा पूर्वेकडील खोऱ्यात वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाबाबत मंत्रालयात महत्त्वाची बैठक पार पडली. दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्यामुळे आणि विनंतीनुसार आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जलसंपदा विभागाचे सचिव श्री. संजय बेलसरे, विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, तर टाटा प्रकल्पाचे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. मुळशी धरणाचे पाणी वीजनिर्मितीसाठी पश्चिमेकडे वळवले जाते, मात्र हे पाणी पुन्हा पूर्वेकडील भीमा-कृष्ण खोऱ्यात वळवल्यास पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो, अशी भूमिका आमदार राहुल कुल यांनी सातत्याने मांडली आहे. मार्च २०२४ मध्ये मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत झालेल्या निर्णयानुसार, पहिल्या टप्प्यात पिण्यासाठी पाणी वळविण्यास मंजुरी मिळाली होती. याच निर्णयाची आता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी आमदार कुल यांनी बैठकीत आग्रही मागणी केली. पहिल्या टप्प्यात जे पाणी पिण्यासाठी वळवण्याचा निर्णय झाला आहे, त्या कामाची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. टाटा पॉवरच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाणी वळवण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडथळे दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, जलसंपदा मंत्र्यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हे काम अत्यंत प्रभावीपणे आणि विहित वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

## स्वारातीम' विद्यापीठाची २६ वर्षांनंतर सुवर्णझेप; राष्ट्रीय युवक महोत्सवात ऐतिहासिक यश

### *यशवंत महाविद्यालय नांदेडचा विद्यार्थी प्रज्योत कांबळेचे म्युझिक मध्ये घवघवीत यश*

अर्धापूर (दै. संध्या)



नुकत्याच चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षांनंतर ऐतिहासिक यश संपादन केले आहे.देशातील ८ झोन मधील १४२ नामांकित विद्यापीठां मध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत विद्यापीठाने लोक / आदिवासी नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक पटकावले.या स्पर्धेत विद्यापीठाने सहभाग घेतलेल्या सर्व सात कलाप्रकारात पारितोषिके मिळवत १०० टक्के यशाची नोंद केली.यामध्ये लोक / आदिवासी नृत्य (दंडार नृत्य) आणि रॅली / मिरवणूक या प्रकारात प्रथम क्रमांक,माईम (मूक अभिनय), लोक वाद्यवृंद, शास्त्रीय वाद्य एकल आणि लघुनाटिका (स्किट) या प्रकारांत द्वितीय क्रमांक तर संकल्पना नृत्य प्रकारात पाचवा क्रमांक मिळाला. आदि उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाचा संघ आता आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरला आहे.विशेष म्हणजे २६ वर्षांपूर्वी लोकनृत्यात मिळवलेल्या सुवर्ण यशाची परंपरा नव्या पिढीने पुन्हा जिवंत केली आहे.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजपालसिंह चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली संघाने अल्पावधीत मोठे आव्हान पेलत हे यश मिळवले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन,कुलसचिव डॉ.डी. डी.पवार,वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे,परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंह साबळे, अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील,डॉ. चंद्रकांत बाविस्कर,आय.आय.एल. चे संचालक डॉ.शैलेष वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी,एन.एन.एस. चे संचालक डॉ.मारोती गायकवाड, आय.क्यू.ए. सी.चे संचालक डॉ. सुरेन्द्रनाथ रेड्डी,कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर,जनसंपर्क अधिकारी डॉ.अशोक कदम आदी मान्यवरांनी संघाचे कौतुक केले.

यशवंत महाविद्यालय नांदेडचा बी.ए तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु.प्रज्योत अनिल कांबळे याने म्युझिक या स्पर्धेमध्ये एकुण २ कला प्रकारात सहभाग घेतला व क्रिएटिव्ह डान्स मध्ये स्वतः कोरियोग्राफ केलेल्या दोन्ही इव्हेंटसला राष्ट्रिय पारीतोषिक मिळाले आहे.यामध्ये प्रज्योत कांबळे ने दुहेरी यश संपादन केल्यामुळे त्याच्या या उज्वल यशाबद्दल यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेशचंद्र शिंदे,म्युझिक डिपार्टमेंट hod शिंदे,चाटे मॅडम,प्रा. शिवदास शिंदे व सर्व प्राध्यापक वर्ग यांच्या सह सौ.जयशिला उध्दवराव सरोदे,सौ. ज्योती अनिल कांबळे,अँड.गौरव सरोदे,वैभव सरोदे,अमोल सरोदे, शिक्षिक माया बळीराम कांबळे, सिध्दार्थ जोंधळे,भिमानंद लघुळकर,रमा प्रविण जाधव,स्वाती विक्रांत कांबळे,विशाखा दिपक जमदाडे,वैष्णवी कांबळे,किरण प्रेम कांबळे आदिंनी अभिनंदन करून शुभेच्छा देवून कौतुक केले आहे. त्याचबरोबर प्रज्योत कांबळेच्या या यशाबद्दल इतर सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून संघाचे व्यवस्थापन डॉ.संदीप काळे व सिद्धार्थ नागठाणकर यांनी सांभाळले तर लोकनृत्यासाठी संदेश हटकर,रॅली व लघुनाटिकेसाठी दिग्दर्शक दिलीप डोम्बे यांनी प्रशिक्षण दिले.डॉ.शिवराज शिंदे यांनी लोकसंगीतासाठी मार्गदर्शन केले. तसेच संकेत गाडेकर आणि संभा कांबळे यांनीही यशासाठी विशेष योगदान दिले आहे.या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद,अधिसभा सदस्य,विद्यार्थी विकास मंडळ यासह विद्यापीठ परिसरातील संचालक,प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी आणि विविध स्तरांतून विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### अनुदानित शाळांना दिलासा : भाडेवाढ स्थगिती व 39 शाळांना टप्पा अनुदान लागू



मुंबई (दैनिक संध्या) : महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवडकर यांच्याकडे विविध शैक्षणिक समस्यांबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले होते. या निवेदनामध्ये प्रामुख्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतींमध्ये कार्यरत असलेल्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांच्या अडचणींचा समावेश करण्यात आला होता. सदर निवेदनात दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला होता. त्यापैकी पहिल्या मुद्द्यानुसार, महानगरपालिकेच्या शालेय इमारतींमध्ये कार्यरत असलेल्या खाजगी अनुदानित मराठी व प्रादेशिक माध्यमांच्या शाळांवर दरवर्षी लादण्यात येणाऱ्या १० टक्के भाडेवाढीमुळे संस्था चालकांवर मोठा आर्थिक ताण येत होता. या पार्श्वभूमीवर सदर भाडेवाढीला स्थगिती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे संबंधित संस्था चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच, बृहन्मुंबई क्षेत्रातील मराठी व इतर माध्यमांच्या अनुदानित शाळांना राज्य शासनाने सन २००१ पासून अनुदान मंजूर केले होते. मात्र, त्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून वेतन मंजुरी मिळणे अपेक्षित असूनही अनेक शाळा दीर्घकाळ प्रतीक्षेत होत्या. एकूण ३९ शाळा या अनुदानाच्या प्रतीक्षेत असल्याचे निदर्शनास आले होते. या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून महानगरपालिकेने टप्प्याटप्प्याने अनुदान लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता सर्व ३९ शाळांना टप्पा अनुदान लागू करण्यात आले असून संबंधित शिक्षकांचे वेतन सुरळीतपणे सुरू झाले आहे. गेल्या दहा वर्षांपासून महामुंबई शिक्षण संस्था संघटना तसेच इतर संबंधित संघटनांच्या सहकार्याने या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. अखेर या प्रयत्नांना यश आपल्या व राज्य शासनाच्या सहकार्यामुळे मिळाले असून या निर्णयांमुळे सर्व संस्था चालक व शिक्षकांना योग्य तो न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवडकर यांनी घेतलेल्या या सकारात्मक व दूरदृष्टीपूर्ण निर्णयाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

### अनेक मोठ्या माशांवर कारवाई झाली पाहिजे

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या अत्यंत संतापजनक आणि अशोभनीय घटनांवरून हे स्पष्ट होत आहे की, सत्तेत बसलेल्या महायुती सरकारला जनतेच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही. रूपाली चाकणकर यांचा राजीनामा आणि खरात प्रकरणातून समोर आलेली मंत्र्यांची भोंदूगिरी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीला लागलेला काळिमा आहे अस काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाची बसलेल्या रुपाली चाकणकर यांनी महाराष्ट्रातील महिलांना न्याय मिळवून देणे अपेक्षित होते पण त्यांनीच एका भोंदू बाबाचे मानसिक गुलामगिरी पत्करली ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. ज्योतिष आणि अनिष्ट प्रथांवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्ती महिलांना काय न्याय देणार?त्यांचा राजीनामा हा केवळ दिखावा नसून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे, अस वडेट्टीवार आज नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले. लिंगपिसाट खरात याच्या संपर्कात आलेल्या सर्व 'नवरत्नांचा' आणि मंत्र्यांचा CDR तपासला पाहिजे. खरातकडे असलेली अफाट संपत्ती आणि त्याला मंत्र्यांनी दिलेला राजाश्रय पाहता, हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. पोलिसांवर दबाव टाकून मोठे मासे वाचवण्याचे षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केला. एकीकडे खरातसारख्या व्यक्तीचे पाय धुतले जात आहे, तर दुसरीकडे कीर्तनकारांकडून अल्पवयीन मुलींवर अत्याचार होत आहेत. धर्माच्या नावाखाली सुरू असलेला हा अधर्म थांबवण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली पाहिजे,अस वडेट्टीवार म्हणाले. अरविंद शिंदे या काँग्रेसच्या नेत्यांनी चाकणकर प्रकरणी व्यक्त केलेली भूमिका ही त्यांची वैयक्तिक आहे पक्षाची नाही अस ही वडेट्टीवार यांनी यावेळी स्पष्ट केले. सातारा येथील निवडणुकीत बहुमत असतानाही शंभूराजे देसाई पालकमंत्री असताना त्यांच्याच सहकाऱ्यांना पळवून नेण्यात आले.यात मंत्री जखमी झाले. भाजप सत्तेसाठी कोणत्या थराला जात आहे आणि ट्रिपल इंजिन सरकारमधील इंजिन कोणत्या दिशेने जात आहे हे यावरून स्पष्ट होत आहे. मित्र पक्षातील मंत्री निधीवरून नाराज आहेत आणि एकमेकांची जिरवण्याच्या नादात जनतेचे नुकसान महायुती सरकार करत असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.



### सार्वजनिक आरोग्य विभागाचा सीआयएफएफ सोबत सामंजस्य करार

मुंबई (दैनिक संध्या) : लोककेंद्रित व अधिक परिणामकारक सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम राबविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने चिल्डरेन्स इन्व्हेस्टमेंट फंड फौंडेशन (सीआयएफएफ), युनायटेड किंगडम सोबत सामाजिक व वर्तन बदल संप्रेषण उपक्रम बळकट करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. राज्यातील राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या करारासाठी विशेष पुढाकार घेतला. या करारावर सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, उपसचिव चंद्रकांत विभुते, सीआयएफएफ कडून डॉ. हेमांग शाह व डॉ. अस्मिता जैन, तसेच आय पी आय कडून राघवेश राजन आणि अविधा यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या भागीदारीअंतर्गत सामाजिक व वर्तन बदल उपक्रम अधिक नाविन्यपूर्ण, पुराव्यावर आधारित व संशोधनाधारित पद्धतीने राबविले जाणार असून, समुदाय सहभाग व प्रभावी संवाद यावर विशेष भर दिला जाणार आहे. या सहकार्याचा उद्देश आरोग्यविषयक वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आणि राज्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राज्यभर पोहोचविणे व त्याची परिणामकारकता वाढविणे हा आहे. हा उपक्रम माता व बाल आरोग्य, पोषण, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि रोग नियंत्रण यांसारख्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीस बळकटी देईल. विशेषतः वंचित व दुर्लक्षित घटकांपर्यंत महत्त्वाचे आरोग्य संदेश व सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. या कराराच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संवाद माध्यमे आणि समुदाय सहभाग यांचा वापर केला जाणार आहे. विशेषतः कुपोषण, स्वच्छता, लसीकरण आणि आरोग्यदायी सवयी याबाबत जनजागृती वाढवण्यावर भर दिला जाईल. राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये सामाजिक वर्तन बदल उपक्रम मजबूत करण्यासाठी CIFF तांत्रिक आणि धोरणात्मक सहकार्य करणार आहे. यामुळे आरोग्य योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होऊन नागरिकांच्या आरोग्यात सुधारणा अपेक्षित आहे.

# बिलोलीत पहिल्यांदाच मे महिन्यात होणार मन्नेरवारलू वधू वर परिचय मेळावा

## सकल मन्नेरवारलू जमातीचा जिल्हास्तरीय उपवधू-वर परिचय मेळावा : तेलंगणा राज्यातील वधू वर उपस्थित राहणार

बिलोली (दै. संध्या)



मे महिन्यात बिलोलीमध्ये एक मोठा जिल्हास्तरीय मन्नेरवारलू वधूवर परिचय मेळावा आयोजित केला जाणार आहे. बिलोलीतील मन्नेरवारलू समाजातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांच्या संकल्पनेतून बिलोली मध्ये प्रथमच समाजातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय मेळाव्याचं आयोजन होणार आहे. ज्यात वधू-वरांची एकमेकांना परिचय करुन देण्याची संधी मिळणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत.

या मेळाव्यात विशेषतः समाजाच्या विविध घटकांच्या वधू-वरांचा सहभाग होईल. तेलंगणा राज्यातील वधू वर उपस्थित राहणार असून दोन राज्यातील नाते अधिक घट्ट होणार असल्याचे सांगितले आहेत. अशा प्रकारचे परिचय मेळावे विवाहाच्या योग्य जोडीदाराची निवड करण्यास मदत करतात. यामध्ये अनेक परिवार आपले इच्छित वधू-वर शोधण्यासाठी एकत्र येतील. सर्व समाज बांधवांचे योगदान व सहकार्याने नांदेड जिल्ह्यातून उपवधू - वर नोंदणीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यासाठी मन्नेरवारलू समाजातील सर्व शिक्षित, उच्चशिक्षितांसह विविध क्षेत्रातील मुला मुलींना अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी त्यांच्या पालकांनी विवाह इच्छुकांच्या परिचय पत्रासह पूर्व नोंदणी बिलोली शहरातील अनेक ठिकाणी नोंदणी करता येणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी म्हटले आहेत.

जिथे उच्चशिक्षित आणि अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी उपवर-वधू व पालकांना एकाच व्यासपीठावर संधी मिळते. 2026 या वर्षासाठी नाव नोंदणी सुरू आहे आणि अशा मेळाव्यांमध्ये जातीच्या पोटजाती, वडिलोपार्जित मुळे व शिक्षणानुसार स्थळे शोधणे सोपे होते. वधू-वर परिचय मेळावा हे विवाह इच्छुक तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांसाठी प्रत्यक्ष भेटून स्थळे पाहण्याचा, ओळख करून घेण्याचा आणि नाते निश्चित करण्याचा एक उत्तम व्यासपीठ आहे. नाव नोंदणी केल्यानंतर उपवर वधूची माहिती असलेली उपयुक्त पुस्तिका मेळाव्याच्या दिवशी देण्यात येईल.

नाव नोंदणी करण्यासाठी सागर सुरोड यांचे श्री साई मोबाईल शॉप्पी, जुना बस स्टॅन्ड जवळ, बिलोली आणि नागेश कसलोड यांचे गुरु माऊली मल्टि सर्व्हिसेस, जुन्या पंचायत समितीच्या बाजूला, बिलोली तसेच संदीप पुपुलवाड यांचे ओमसाई ऑनलाईन सेवा केंद्र, तहसीलच्या गेटजवळ, बिलोली या ठिकाणी नाव नोंदणीसाठी फॉर्म ठेवले असून त्या ठिकाणी फॉर्म भरायचे आहे. वधु वर परिचय मेळावा घेणे सध्या काळाची गरज आहे. जेणेकरून लोकांना स्थळ शोधण्यासाठी बराच खर्च करावा लागतो, अशाप्रकारे परिचय मेळाव्याच्या आयोजनामुळे गोरगरीब लोकांचा खर्च वाचून जाईल आणि चांगले स्थळ त्यांना भेटून जाईल.

तसेच उपवर वधूंनी नाव नोंदणी, जाहिराती, देणगी, शुभेच्छा देण्यासाठी 8888087513 या नंबरचा वापर करावा. मन्नेरवारलू समाजातील इच्छुक दानशूर बांधवांनी या कार्यास आर्थिक मदत देखील या नंबरवरच करावी तसेच अधिक माहिती मिळवायची असल्यास संबंधित आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## केंद्र प्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना

## माहिती भरण्यास ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

मुंबई (दै. संध्या)

पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ चा निकाल जाहीर केला असून तो परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा महाटीइटी अथवा सीटीइटी उत्तीर्ण झाल्याची माहिती भरण्यासाठी २२ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्र प्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ घेण्यात आली होती. ही ऑनलाइन परीक्षा ३ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान तीन सत्रांत पार पडली. परीक्षेसाठी एकूण ४६०६८ परीक्षार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरले होते, त्यापैकी ३८५५९ परीक्षार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित होते.

परिषदेकडून हा निकाल १३ मार्च २०२६ रोजी परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ www.mscepune.in वर जाहीर करण्यात आला. परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांनी महाटीइटी अथवा सीटीइटी ही सर्वात पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती पूर्वी १६ मार्च ते २१ मार्च २०२६ या कालावधीत https://mscepune.in/dtedola/KP२०२६Info.aspx या लिंकवर भरायची होती. मात्र उमेदवारांकडून मुदतवाढीची मागणी झाल्याने आता ही माहिती २२ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत भरण्याची अतिरिक्त संधी देण्यात आली असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी प्रसिद्धी पत्रकामध्ये म्हटले आहे.

## ‘ध्यास’ आणि ‘रंगकर्मी’ सन्मानांचा भावपूर्ण सोहळा रवींद्र नाट्यमंदिरात संपन्न!

मुंबई (दै. संध्या)

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मराठी संस्कृती आणि भाषेचा गौरव करणारा विनोद आणि महेंद्र पवार यांच्या 'अ‍ॅड फिझ' निर्मित ‘चैत्र चाहूल’ हा कलेचा, संस्कृतीचा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा मानाचा कार्यक्रम यंदाही अत्यंत दिमाखात पार पडला. गेली दोन दशके सातत्याने आयोजित केला जाणारा हा सोहळा यावर्षी गुरुवार, १९ मार्च २०२६ रोजी रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात अभिनेता वैभव मांगले यांच्या प्रभावी कथावाचनाने झाली. त्यांनी प्रख्यात लेखक विद्याधर पुंडलिक यांच्या ‘माळ’ या गाजलेल्या कथेचे वाचन सादर केले. मानवी नातेसंबंध, एकटेपणा आणि भावनिक पोकळी यांचे सूक्ष्म दर्शन घडवणाऱ्या या कथेचे त्यांनी केलेले सादरीकरण इतके जिवंत होते की, सभागृहातील रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. ‘माळ’ ही केवळ ओसाड जागेची प्रतिमा नसून, मनातील रिकामेपणाचे प्रतीक आहे, हे त्यांनी आपल्या वाचनातून प्रभावीपणे उलगडले. मास्तर आणि काशीताई यांसारख्या व्यक्तिरेखा जणू रंगमंचावर सजीव झाल्याचा भास रसिकांना झाला. उपस्थितांनी या वाचनाला उत्स्फूर्त दाद दिली.

यानंतर ‘ध्यास’ आणि ‘रंगकर्मी’ सन्मानांचे वितरण करण्यात आले. पुण्यातील ‘सुदर्शन रंगमंच’च्या शुभांगी दामले यांना ‘ध्यास सन्मान’ प्रदान करण्यात आला, तर प्रख्यात लेखक व भाष्यकार सुरेश गोसावी यांना ‘रंगकर्मी सन्मान’ देऊन गौरविण्यात आले. सन्मान स्वीकारताना शुभांगी दामले यांनी सांगितले की, नाट्यदर्पण रजनीकार सुधीर दामले यांच्या प्रेरणेतून सामाजिक कार्याची दिशा मिळाली आणि इतरांना संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्यासातून आपली वाटचाल घडली. तर सुरेश गोसावी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले, “आजपर्यंत लिहिले खूप, पण बोलण्याचा प्रसंग पहिल्यांदाच आला. बाजुस पडलेल्या दगडाला मोठे पण द्यायचा आज उत्सव आहे. नमस्कार”

या प्रसंगी निलेश जाधव यांनी पद्मश्री डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांना स्वतः तयार केलेल्या विठोबाच्या तैल चित्राची आकर्षक फोटोफ्रेम भेट दिली. तसेच त्यांना सापडलेल्या सोन्याच्या दागिन्यांतून मिळालेली रक्कम सामाजिक कार्यासाठी देण्याचा उदात्त निर्णय घेत, पेण येथील दिव्यांग मुलांसाठी कार्यरत ‘सुहित जीवन ट्रस्ट’च्या संचालिका सुरेख पाटील यांच्याकडे ती रक्कम सुपूर्द करण्यात आली. यावेळी ‘अ‍ॅड फिझ’ निर्मित ‘तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल’ या कॉफीटेबल पुस्तकाची झलकही सादर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पद्मश्री डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांनी ‘रंग विठ्ठल’ हा खास ‘चैत्र चाहूल’साठी सादर केलेला अभंग रसिकांसमोर सादर केला. त्यांच्या सुरेल गायनाला तबल्यावर यती भागवत, संवादिनीवर ज्ञानेश्वर सोनवणे, तालवाद्यावर सूर्यकांत सुर्वे, पखवाजवर हनुमंत रावडे, बासरीवर अमर ओक तसेच स्वरसाथीसाठी निमिष कैकाडी, स्वरांगी मराठे आणि स्वराली जोशी यांनी समर्थ साथ दिली.

## सेप्ट युनिव्हर्सिटीने मास्टर्स इन फर्निचर डिझाईन अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची केली घोषणा

पुणे (दै. संध्या)

CEPT UNIVERSITY

सेप्ट युनिव्हर्सिटीने मास्टर्स इन फर्निचर डिझाईन (एमएफडी) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची घोषणा केली आहे. डिझाईन क्षेत्रातील पुढील पिढीचे व्यावसायिक आणि उद्योजक घडविणे हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. नोंदणी ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे राहत्या घरातील नाजूक अंतर्गत सजावटीपासून ते गतिमान कार्यस्थळांपर्यंत आज फर्निचर आपल्या जगण्याच्या, कामाच्या आणि परस्पर संवादाच्या पद्धतीला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सेप्ट चा एमएफडी कार्यक्रम या बदलाला प्रतिसाद देणारा आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि अशी कौशल्ये शिकवली जातात, जी त्यांना फर्निचर क्षेत्रातील विविध शक्यता आणि खाचाखोचा समजून घेण्यास मदत करतात. यामध्ये ऑनलाइन बाजारपेठांपासून ते भाड्याने देण्याच्या सेवांपर्यंत, मोठ्या उद्योगांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादन प्रणालींपासून ते सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) मोठ्या प्रमाणावरील उत्पादनापर्यंतच्या बाबींचा समावेश आहे. रचनात्मकता आणि तांत्रिक कौशल्य यांचा संगम साधणे हा या कार्यक्रमाचा गाभा आहे. यात विद्यार्थ्यांना साहित्य, उत्पादन प्रक्रिया, प्रोटोटाइपिंग, अर्गोनॉमिक्स आणि डिझाईनचे तपशील यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. त्याचबरोबर त्यांना उद्योगाचे व्यावसायिक आणि आर्थिक पैलू देखील समजतात. मॉड्यूलर सिस्टीमची रचना करणे असो, नवीन साहित्यासोबत प्रयोग करणे असो किंवा विस्तारक्षम (स्केलेबल) फर्निचर सोल्यूशन्स तयार करणे असो, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना डिझाइनर आणि इनोव्हेटर या दोन्ही भूमिकांमधून विचार करण्यास प्रोत्साहित करतो.

'स्टुडिओ युनिट' प्रणाली हे सेप्ट च्या शिक्षणपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. यामध्ये छोट्या व सहयोगात्मक गटांमध्ये शिक्षण देण्यात येते व प्राध्यापकांचे जवळचे मार्गदर्शन लाभते. डिझाईन स्टुडिओ हे फर्निचर डिझाईनची मूलतत्त्वे, नाविन्यपूर्ण साहित्य आणि तंत्रज्ञान, सार्वजनिक वापरासाठीचे फर्निचर, सिस्टीम डिझाईन आणि उद्योग-सहयोगी स्टुडिओ यांसारख्या संकल्पनांवर आधारित आहेत. हा कार्यक्रम वर्गाबाहेरील व्यापक अनुभव देखील पुरवतो. विद्यार्थी नियमितपणे उत्पादन कारखाने, व्यापार मेळे, प्रदर्शने आणि डिझाईन स्टुडिओला भेट देतात, तसेच उद्योगातील तज्ज्ञ, अतिथी प्राध्यापक आणि व्यावसायिकांशी संवाद साधतात. सेप्ट च्या विस्तृत उद्योग नेटवर्क आणि वाढत्या प्लेसमेंट सपोर्टमुळे, पदवीधर आत्मविश्वासाने व्यावसायिक जगात प्रवेश करण्यास सुसज्ज होतात.

## १९ ते २६ मार्च दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महासंस्कृती अंतर्गत राज्यातील सांस्कृतिक परंपरा जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने “सांस्कृतिक महोत्सव” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव १९ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ७.३० वाजता आयोजित करण्यात येणार असून, कार्यक्रमाचे स्थळ लोअर परळ ब्रिज खाली, कोकण वैभव समोर, ना. म. जोशी मार्ग, मुंबई - १३ असे आहे. या सांस्कृतिक महोत्सवात संगीत, नृत्य, लोककला, पारंपरिक कला प्रकार तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे स्थानिक समन्वय शेलारमामा फाऊंडेशन, कुलस्वामिनी श्री भैरी भवानी चैत्र नवरात्रोत्सव यांच्या सहकार्याने करण्यात येत आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून, तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना सन्मान व प्रतिष्ठा मिळेपर्यंत लढा सुरूच राहील

## शेतकरी नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांचे प्रतिपादन; पहिला 'युगद्रष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान

पुणे (दै. संध्या)



"अन्नदाता शेतकरी आज चेष्टेचा, उपहासाचा विषय ठरला आहे. हाच शेतकरी जोवर सन्मानाचा, प्रतिष्ठेचा विषय होत नाही, तोवर आमचा लढा आणि संघर्ष सुरूच राहील," असे प्रतिपादन माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले. शेतीव्यवसायात बुवाबाबांचा शिरकाव, मंत्रतंत्राचा वापर चीड आणणारा असल्याचेही सांगून मंत्रा-तंत्राने शेती यशस्वी झाली असती, तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असत्या का? असा सवालही शेट्टी यांनी उपस्थित केला.

सरहद पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीने आयोजित शहीद भगतसिंह यांच्या पुतणीने लिहिलेल्या 'युगद्रष्टा भगतसिंह आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज' या भगतसिंह यांच्या अधिकृत जीवनचरित्राचे प्रकाशन व शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राजू शेट्टी यांना 'युगद्रष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्यात शेट्टी यांना भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. टिळक रस्त्यावरील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मायदेश फाऊंडेशनचे अरुण जोशी, सत्यशील राजगुरू, ज्येष्ठ उद्योगपती कृष्णकुमार गोयल, सरहद संस्थेचे संजय नहार, कृष्णा पब्लिकेशनचे संचालक चेतन कोळी, अनुवादक इंद्रायणी चव्हाण, प्रसिद्ध व्याख्याते केतन पुरी आदी उपस्थित होते.

राजू शेट्टी म्हणाले, "ज्यांच्या नावाचा, कार्याचा आदर्श घेत चळवळीत उतरलो, आज त्याच सरदार भगतसिंह यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे, हा माझा फार मोठा सन्मान आहे. भगतसिंह यांनी अगदी कोवळ्या वयात देशाच्या भवितव्याबद्दल, शेतकरी, कष्टकरी, वंचित, शोषित यांच्यासाठी भूमिका घेतली, जे विचार मांडले आणि लेखन केले, ते प्रेरणादायी आहेत. तीच प्रेरणा घेऊन आजवर शेतकऱ्यांसाठी आवाज उठवला. संसदेत राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्यांना व्यासपीठ दिले. हे सारे निर्भयपणे केले. माझ्यावर वैयक्तिक हल्ले झाले. संघटना फोडण्याचे प्रकार केले गेले. माझे सहकारी दूर करण्यात आले. पण न डगमगता मी लढत राहिलो आहे आणि यापुढेही लढत राहीन."

किरणजितसिंह म्हणाले, "भगतसिंह व्यक्तीपुरते मर्यादित नव्हते. ती विचारधारा आहे. क्रांतीकार्य करणारे आणि बलिदान देणारे भगतसिंह सर्वपरिचित आहेत, पण मानवी जीवनाला सर्वोच्च स्थान देणारे, शेतकरी, कामगार, वंचित, शोषित, श्रमजीवी आणि महिलांविषयी आस्था बाळगणारे, त्यांच्या प्रतिष्ठेसाठी झटणारे, राष्ट्रीय अस्मितेसाठी असेंब्लीत बॉब टाकणारे आणि जुलमी ब्रिटिश अधिकार्यांवर गोळ्या झाडणारे भगतसिंह, असे त्यांचे अनेक पैलू आहेत. भगतसिंहांनी त्यांच्यावरील सर्व खटल्यांत स्वतःच बाजू मांडली आणि ती मांडताना ती न्यायालये त्यांनी वैचारिक व्यासपीठे बनवली. अन्यायाविरोधात संघर्ष, ही त्यांची भूमिका आजच्या पिढीला प्रेरक ठरेल."

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात केतन पुरी यांनी भगतसिंहांचा धगधगता जीवनप्रवास, त्यांच्या प्रेरणांसह प्रेक्षकांसमोर ठेवला. क्रांतिकारक भगतसिंह द्रष्टे विचारवंत, सिद्धहस्त लेखक, ध्येयनिष्ठ राजकारणी, उत्तम वक्ते अशा सर्वच पैलूंनी युक्त असे व्यक्तिमत्त्व होते. किशोरवयापासूनच त्यांनी जीवनाचे ध्येय निश्चित केले होते. त्यांचे योगदान तरुणाईसाठी प्रेरक आहे, असे ते म्हणाले.

अरुण जोशी यांनी मायदेश फाऊंडेशनची माहिती दिली. कृष्णकुमार गोयल, संजय नहार, अनुवादक इंद्रायणी चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. चेतन कोळी यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले.

# श्री जोपादेवी यात्रा उत्साहात संपन्न



**चाकण (दै. संध्या)**

खालुंब्रे (ता. खेड) येथे सलग दोन दिवस सुरू असलेल्या श्री जोपादेवी यात्रेची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही खालुंब्रे येथे श्री जोपादेवी यात्रेची जोरदार तयारी करण्यात आली होती. यात्रेच्या पहिल्या दिवशी देवदेवतांचा अभिषेक, पूजा, विधीवत धार्मिक कार्यक्रम मोठ्या दिमाखात संपन्न झाले. त्यानंतर खालुंब्रे ग्रामस्थ व बैलगाडा शौकिनांनी बैलगाड्यांचा थरार अनुभवला. विजेत्या बैलगाडा मालकांना यात्रा कमिटीच्या वतीने जाहीर करण्यात आल्याप्रमाणे रोख रकमेसह ट्रॅक्टर, बुलेट गाडी, कुटी मशीन व गौरवचिन्ह बहाल करून सन्मानित करण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश कांताराम बोत्रे यांच्यातर्फे बैलगाडा शर्यतीतील प्रथम क्रमांकास रोख ७१ हजार रुपये, तर प्रथम क्रमांकाच्या फळीफोड गाड्यास उद्योजक मारुती बोत्रे यांच्यातर्फे ७ हजार रुपये इनाम देण्यात आला. त्याचप्रमाणे श्री जोपादेवी यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचा शुभारंभ पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या पहिलवानास उद्योजक गणेश बोत्रे व खेड पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल पवार यांच्या वतीने रोख इनाम देण्यात आला. द्वितीय क्रमांकास माजी उपसरपंच दिलीप रामदास बोत्रे व खालंब्रे सोसायटीचे संचालक राजाभाऊ बोत्रे यांच्यातर्फे पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच स्व. राजाराम गीताराम बोत्रे यांच्या स्मरणार्थ खालुंब्रे गावचे माजी उपसरपंच मनोज बोत्रे यांच्यातर्फे पारितोषिक देण्यात आले.

करमणुकीसाठी आयोजित करण्यात आलेले सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न होण्यासाठी उद्योजक दिलीप बोत्रे, गणेश बोत्रे, मनोज बोत्रे, तुषार पवार, विशाल तुळवे व यात्रा कमिटीने विशेष परिश्रम घेतले.



# पुरंदरच्या राजेवाडीत संत साहित्यिकांची मंदियाळी

**पुरंदर (दै. संध्या)**

## श्रीराम मूर्तिची झाली पुर्नस्थापना

पुरंदर तालुक्यातील राजेवाडी गावात ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेला उजाळा देणारा श्रीराम मूर्ती पुनर्स्थापना सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. सुमारे अडीचशे वर्षांचा वारसा लाभलेल्या प्राचीन श्रीराम मंदिरातील मूर्तींची विधिवत पुनर्प्रतिष्ठा करण्यात आली.

या सोहळ्याला संत, साहित्यिक आणि अभ्यासकांची विशेष उपस्थिती लाभली. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी अध्यक्ष ह.भ.प डॉ. भावार्थ देखणे,मंदिर स्थापत्य व मूर्ती शास्त्र ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर गो ब देगलूरकर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर वेदांत सत्संग समिती डॉक्टर नारायण महाराज जाधव ह.भ.प. नारायण महाराज जाधव, ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक देगलूरकर यांच्या हस्ते मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली यावेळी आळंदी देवस्थान ट्रस्टी प्रताप पाटील राजेवाडी सरपंच दत्तात्रय जगताप ग्रामपंचायत सदस्य पत्रकार राजेंद्र शिंदे केशव स्वरूप निवास नगरकर कार्यक्रमाचे आयोजन काकडे सर उपस्थित होते यावेळी विविध प्रसंगी ह.भ.प. श्री चंद्रकांत महाराज वांजळे यांचे रामायण विषयावरती सुश्राव्य असे किर्तन झाले गुढीपाडव्या दिवशी श्रीराम मूर्तीची भव्य अशी मिरवणूक राजेवाडी गावात काढण्यात आली यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

अंजिराच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेले राजेवाडी हे गाव ऐतिहासिक श्रीराम मंदिरामुळे धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणूनही ओळखले जाते. परमपूज्य नाना महाराज यांनी स्थापन केलेल्या या मंदिराला यंदा अडीचशे वर्षे पूर्ण झाली असून, त्यानिमित्ताने राममूर्तींची पुनर्स्थापना हा सोहळा विशेष उत्साहात पार पडला.

गुढीपाडव्यापासूनच गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. घराघरांतून उत्सव साजरा केला जात होता. विविध धार्मिक कार्यक्रम, नामस्मरण आणि कीर्तनांनी गाव दुमदुमून गेले.

या प्रसंगी बोलताना डॉ. भावार्थ देखणे यांनी "राजेवाडीत संत, साहित्यिक आणि विचारवंत यांचा एकत्र येण्याचा योग हा संत साहित्यिकांची मांदियाळीच म्हणावी लागेल," असे मत व्यक्त केले. तसेच राजेवाडीला अधिकृत तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

हा सोहळा राजेवाडीच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेला नवसंजीवनी देणारा ठरला असून, भविष्यात या ठिकाणाला अधिक व्यापक ओळख मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे कार्यक्रमाचे आयोजन पूजा धारणे आणि राजेवाडी ग्रामस्थांनी केले.

## 'दत्तकृपा', 'मोढवे' यांचा बैलगाडा प्रथम

**महाळुंगे पडवळ (दै. संध्या):** साकोरे (ता. आंबेगाव) येथे श्री भैरवनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त झालेल्या फायनल बैलगाडा शर्यतीत दत्तकृपा बैलगाडा संघटना व बाजीराव मोढवे (साकोरे) यांचा बैलगाडा प्रथम आला. एकूण १२० बैलगाडा मालकांनी शर्यतीत सहभाग घेतला. गुरुवारी (ता. १९) सकाळी निशाणाची घाटातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर बैलगाडा शर्यतींना प्रारंभ झाला. पुणे जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे, पराग पतसंस्थेचे संचालक पूजन शहा, शिवसेनेचे तालुकाप्रमुख प्रवीण थोरात, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रमेश कानडे, भास्कर डोके, नगरसेवक बाजीराव मोरडे, बाळासाहेब पिंगळे यांनी भेट दिली. सचिन मोढवे यांचा बैलगाडा प्रथम क्रमांकात फळीफोड ठरला आहे. द्वितीय क्रमांकात वैभव चासकर तर तृतीय क्रमांकात संतोष मोहरे यांचे बैलगाडे फळीफोड ठरले. प्रथम क्रमांकातील विजेत्या बैलगाड्यांची फायनल शर्यत घेण्यात आली. त्यामध्ये २२ बैलगाड्यांनी सहभाग घेतला. प्रथम-दत्तकृपा बैलगाडा संघटना तसेच बाजीराव मोढवे (साकोरे), दुसरा-अंकित जाधव (नांदूर) व नारायण शेगर (चास), तिसरा-सचिन साऊंड सर्व्हिस, भागा भय्ये तसेच तुकाराम वायाळ, चौथा-नंदाराम भालेराव (कळंब) तसेच नीलेश कानसकर, पाचवा-अक्षय मोढवे व सीताराम थोरात तर सहावा-शर्विलराजे बारवे (चास) व शशिकांत भालेराव (कळंब) यांचे बैलगाडे विजेते ठरले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### विकास धाडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन



चाकण (दैनिक संध्या) : दिवसेंदिवस चाकण शहराचा विस्तार वाढत चालला असून, सर्वांना बरोबर घेऊन चाकणच्या विकासाला गती देऊ, त्यासाठी चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक विकास नाना धाडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उदघाटन करण्यात आले आहे, असे विचार खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते यांनी व्यक्त केले. चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक विकास नाना धाडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन मोहिते यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरपरिषदेचे गटनेते साहेबराव कड, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, अॅड. वर्षा शेवकरी, नगरसेवक सागर बनकर, विजया तोडकर, आकाश जाधव, धीरज मुटके, माजी सरपंच दत्तात्रय बिरदवडे, चक्रेश्वर पतसंस्थेचे संस्थापक ज्ञानेश्वर केळकर, माजी उपाध्यक्ष शिवाजी धाडगे, तृप्ती जगनाडे, रेश्मा मुटके, अर्जुन धाडगे, स्वामी कानपिळे, प्रमोद टिळेकर, राजेंद्र घुमटकर आदी उपस्थित होते. दिलीप मोहिते यांनी यावेळी विकास धाडगे यांच्या कार्याचा गौरव केला. जनसंपर्क कार्यालय सुरू केल्याने सर्वांशी संवाद साधने सुलभ होणार आहे. गावच्या विकासासाठी राष्ट्रवादीचे नगरसेवक कटिबद्ध राहतील. यात तिळमात्र शंका नाही.

### उत्रौलीत महारुद्र हवन, दुग्धाभिषेक

भोर (दैनिक संध्या) : उत्रौली (ता. भोर) येथे किर्वे परिवारातर्फे श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन उत्साहात पार पडला. यानिमित्त स्वामीसुत विरचित प्रकटकांड वाचन, महारुद्र हवन, दुग्धाभिषेक, होमहवन, गणपती अथर्वशीर्ष, श्रीसुक्त आवर्तने, महिलांचे महारुद्र पठण या कार्यक्रम आयोजन करण्यात आले. शुक्रवारी (ता. २०) पहाटे श्रींच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करण्यात आला. श्री स्वामी समर्थांच्या पादुका आणि प्रतिमेस आकर्षक सजावट करण्यात आली. केंद्रामार्फत उत्रौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रांगोळीकार सुयोग खाडे यांची कार्यशाळा तसेच जिल्हा परिषदेच्या तीन शाळांना वर्तमानपत्र सुरू करण्यात आली. सायंकाळी भाविकांच्या उपस्थितीत महाराजांच्या आरतीचा सोहळा पार पडला.

# अपघातग्रस्त ऋत्विकला आधार

## विविध स्तरांतून मदतीचा हात



**जुन्नर (दै. संध्या)**

धनगरवाडी (ता. जुन्नर) येथील ढोबळे कुटुंबातील ऋत्विक अनिल ढोबळे याला सामाजिक संस्थांकडून मदतीचा हात देण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातात ऋत्विकचा एक पाय गमवावा लागला असून त्याचे कुटुंब अत्यंत गरिबीत जीवन जगत आहे. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटुंबाला तातडीच्या मदतीची गरज होती.

अश्विनी पिंगळे यांनी ही माहिती डिसेंट फाउंडेशन पर्यंत पोहोचवल्यानंतर संस्थेकडून तत्काळ मदत करण्यात आली. फाउंडेशनतर्फे ऋत्विकला व्हीलचेअर व पाच हजार रुपये रोख देण्यात आले. तसेच संस्थेचे सदस्य डॉ. अमेय डोके यांच्या माध्यमातून त्याला पौष्टिक आहाराची सोय करण्यात आली आहे. पुढील एका महिन्यात कुटुंबासाठी शौचालय बांधून देण्याचेही त्यांनी जाहीर केले.

याशिवाय, ओतूर येथील दहावी 'क'च्या माजी विद्यार्थ्यांनी तीन ते चार महिने पुरेल एवढा किराणा उपलब्ध करून दिला. गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत सुमारे ७५ हजार रुपये रोख रक्कम जमा केली असून तीही या कुटुंबाला देण्यात येणार आहे.

या प्रसंगी जितेंद्र बिडवई यांनी समाजाला आवाहन करताना सांगितले की, "अशा कठीण प्रसंगी जात, पात, धर्म किंवा प्रांत न पाहता समाजाने एकत्र येऊन गरजूंच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे." या मदतकार्यावेळी डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण यांच्यासह बाळासाहेब खिलारी, महेंद्र खिलारी, गणेश मेहेर, शिरीष डुंबरे, प्रीतम डुंबरे, निलेश महाले, संजय गायकर, इंद्रजित शेळके, मयूर शेळके, प्रवीण शेळके, मंगेश शेळके, हनुमंत शेळके, रवींद्र शेळके आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवत्ता संवर्धन तपासणीत भामचंद्र विद्यालय अव्वल

**चाकण (दै. संध्या)**




जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पंचायत समिती खेड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेल्या शालेय गुणवत्ता संवर्धन तपासणीत खेड तालुक्यातील भांबोली येथील श्री भामचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला असल्याची माहिती मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व विद्यालयाचे प्राचार्य संजय बोरकर यांनी दिली.

माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले व जिल्हा मुख्याध्यापक संघ आदींच्या मार्गदर्शना खाली गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत जिल्ह्यातील शाळांची तपासणी करण्यात आली. यात भौतिक सुविधा, प्रशासन विषयक, अध्ययन, अध्यापन, शालेय गुणवत्ता, विशेष उपक्रम, शिक्षक मूल्यमापन आदी विविध बाबींची तपासणी करण्यात आली. त्यात पाचवी ते बारावी, आठवी ते बारावी, आठवी ते दहावी, पाचवी ते दहावी असे चार गट तयार करण्यात आले होते. सुमारे ८५ शाळांची यावेळी तपासणी करण्यात आली होती.

पाचवी ते बारावी गटात भांबोली येथील श्री भामचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला. आळंदी येथील ज्ञानेश्वर विद्यालय, कडूस येथील रामभाऊ म्हाळगी विद्यालय, वाडा येथील कर्मवीर भाऊराव विद्यालय, चास येथील जवाहर विद्यालय, वेताळे येथील सिद्धेश्वर विद्यालय, चाकण येथील कन्या विद्यालय आदी प्रशालांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. आठवी ते बारावी गटात प्रथम क्रमांक मॉडर्न हायस्कूल भोसे, द्वितीय स्व. सुरेशभाऊ गोरे विद्यालय चाकण, तृतीय बाबुराव पवार विद्यालय बिरदवडी यांचे आले आहेत. आठवी ते दहावी गटात प्रथम आदर्श विद्यालय आंबोली, द्वितीय इंदिराजी माध्यमिक विद्यालय मोई, तृतीय रेणुका माध्यमिक विद्यालय रासे यांचा आला आहे. विशेष बाब म्हणजे गतवर्षी विविध गटात जिल्ह्यात प्रथम तीन मध्ये नोंद झालेल्या शाळांची विशेष स्तर म्हणून निवड करण्यात आली होती. त्यात महात्मा गांधी विद्यालय राजगुरुनगर आणि भैरवनाथ विद्यालय दोंदे अशा दोन शाळांची तालुक्यातून निवड करण्यात आली. प्रथम क्रमांकाच्या शाळांची तपासणीही जिल्हा स्तरासाठी करण्यात येणार आहे. माध्यमिक विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर व खेडचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता संवर्धन तपासणी करण्यात आली. याप्रसंगी खेड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर, सचिव रवींद्र चौधरी, जिल्हा संघाचे सहसचिव उत्तम पोटवडे व विविध शाळांचे तज्ज्ञ मुख्याध्यापक उपस्थित होते.

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव : कायद्याची अंमलबजावणी आणि जबाबदारीचा प्रश्न

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्र ही सामाजिक प्रबोधनाची, विवेकनिष्ठ विचारांची आणि परिवर्तनवादी चळवळींची भूमी म्हणून देशात एक वेगळी ओळख निर्माण करून आहे. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक इतिहासात अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीदमन आणि अन्याय यांविरुद्धचा लढा हा केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिलेला दिसतो.महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक विचार मांडत समाजातील अज्ञानाला आव्हान दिले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालत अंधश्रद्धा आणि स्त्रीदमनाला प्रत्यक्ष धक्का दिला, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे समतेचा मार्ग मोकळा केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि मानवी सन्मान या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. या वैचारिक परंपरेतूनच पुढे अंधश्रद्धेविरोधी चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणजे केवळ कायदेशीर चौकट नसून तो समाजाच्या विवेकनिष्ठतेचा आणि प्रबोधनपर भूमिकेचा पुरावा आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या भोंदूगिरीला, फसवणुकीला आणि शोषणाला थांबवण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु, वास्तवातील काही घटनांमुळे हा प्रश्न उभा राहतो की, कायदा असूनही अशा प्रकारच्या घटना का घडतात? विशेषतः महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण हे केवळ गुन्हेगारी प्रकरण नसून ते समाजाच्या मानसिकतेवर, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सत्तेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील भेद समजून घेणे ही या चर्चेची पहिली पायरी आहे. श्रद्धा ही मानवी जीवनाचा सकारात्मक भाग आहे. ती व्यक्तीला मानसिक आधार देते, जीवनातील संकटांमध्ये धैर्य देते आणि नैतिक मूल्यांची जपणूक करते. परंतु, जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते, प्रश्न विचारण्याची क्षमता हरवते आणि ती अंधानुकरणात परिवर्तित होते, तेव्हा ती अंधश्रद्धा बनते. अंधश्रद्धा ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर, विचारशक्तीवर आणि सन्मानावर आघात करते. ती अनेकदा भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांच्यापासून जन्म घेते आणि त्यातून शोषणाला खतपाणी मिळते.

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर 'दैवी उपाय' सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात. महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत.

'कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची?' हा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत. याठिकाणी सत्ताधाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जर सत्तेतील काही लोकच अशा भोंदू व्यक्तींना संरक्षण देत असतील, त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असतील किंवा राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरते. अशा वेळी केवळ कायद्याचा अपमान होत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही ढासळतो.

'याला जबाबदार कोण?' या प्रश्नाचे उत्तर बहुआयामी आहे. सर्वप्रथम, जबाबदारी त्या व्यक्तीची आहे जी अंधश्रद्धेचा वापर करून शोषण करते. दुसरे म्हणजे, त्या यंत्रणांची जबाबदारी आहे ज्या अशा कृत्यांना रोखण्यात अपयशी ठरतात. तिसरे म्हणजे, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, ज्यांनी कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. आणि शेवटी, समाजाचीही जबाबदारी आहे, जो अशा व्यक्तींना अंधश्रद्धेने पूजतो.

समाजातील अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानामुळे निर्माण होत नाही. ती भीती, असुरक्षितता आणि आशेच्या शोधातूनही निर्माण होते. त्यामुळे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

महिलांच्या सशक्तीकरणालाही येथे विशेष महत्त्व आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक जागरूकता यामुळे महिलांना अशा शोषणापासून वाचवता येऊ शकते. त्याचबरोबर, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळवून देणेही आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी अशा घटनांचा निष्पक्षपणे पर्दाफाश केला पाहिजे आणि समाजामध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे. सामाजिक संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींनीही अधिक सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे. शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या आत्मपरीक्षणाचा आहे. आपण खरोखरच पुरोगामी आहोत का? की आपण अजूनही अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेले आहोत? जर श्रद्धेच्या नावाखाली शोषण होत असेल आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करत असू, तर आपली पुरोगामी ओळख ही केवळ दिखावा ठरते. महाराष्ट्राच्या प्रबोधनपर परंपरेला खऱ्या अर्थाने जपायचे असेल, तर केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजामध्ये विवेकाची रुजवणूक आणि प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. तेव्हाच अंधश्रद्धामुक्त, न्याय्य आणि खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्र घडू शकतो.